नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




* वर्ष १६ * अंक २९५ * * भंडारा * सोमवार, दिनांक २१ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त



अग्राग्रलेख

## खरीखरी..

# समन्वय राखला पाहिजे

वक्फच्या मुद्द्यावरून सरकार, सर्वोच्च न्यायालय, बरेचसे विरोधी पक्ष, मुस्लिम समाजाचे अनेक नेते, आता वेगवेगळ्या प्रकारे कार्यरत होत आहेत. येत्या ३० तारखेला हैदराबाद शहरात प्रचंड मोठा विरोध दर्शविण्याचा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमासाठी त्या राज्यातील सत्तारूढ पक्ष आणि इतर अनेक विरोधी पक्षनेते फारच मोठी तयारी करीत आहेत. त्यापूर्वी मानवी साखळी आणि निषेध आंदोलने या ठिकाणी होणार आहेत. ३० एप्रिल रोजी रात्री नऊ वाजता 'ब्लॅक-आऊट' करण्याचे घोषित करण्यात आलेले आहे. त्या तारखेपर्यंत सरकारी आणि विरोधी पक्षाला आपापली निवेदने सर्वोच्च न्यायालयात सादर करावयाची आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेवर किरेन रिजीजू उपराष्ट्रपती धनखड आणि इतर काही नेते वेगळी भूमिका घेत आहेत. आपल्या देशात अशा प्रकारचा वाद होऊन वातावरण चिघळले. तर त्याचे परिणाम एकूणच समाजासाठी आणि समाजाच्या स्वास्थ्यासाठी चांगले असणार नाहीत. वक्फचा मुद्दा निश्चितपणे विवादात्मकच आहे. संसदेने त्यासाठी कायदा केलेला आहे. त्याला राष्ट्रपतींनी मंजुरीही दिलेली आहे. पण हे विधेयक संविधानाला धरून नाही. हा मुद्दा घेऊन सर्वोच्च न्यायालयात १०० पेक्षा जास्त अर्ज याचिका म्हणून आलेले आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश खन्नासाहेबांनी सरकार पक्षाला वेगवेगळे प्रश्न विचारून त्यांच्या उत्तरासाठी पुढील सात दिवस दिलेले आहेत. वक्फ बोर्डावर गैर मुस्लिम सदस्यांना नियुक्त करण्यासाठी कायद्यात तरतूद करण्यात आलेली आहे. हिंदू मंदिराच्या ट्रस्टमध्ये, संस्थांमध्ये किंवा अशा प्रकारच्या कोणत्याही संघटनांमध्ये गैरहिंदू सदस्य घेणे अशी तरतूद आपल्याला परवडेल का, असाही प्रश्न आहे. तिकडे बुद्धगयामध्ये तेथील अधिकार गैर बुद्धांच्या हातून काढून बौद्धांच्या हाती देण्यात यावेत, म्हणून आंदोलन सुरूच आहे. कालच अनधिकृत असल्याचा दाखला देत विलेपार्ले येथील दिगंबर जैन समाजाचे मंदिरही मुंबईच्या पालिकेने आपला हातोडा चालवून पाडलेले आहे. जैन समाजाने केलेल्या अहिंसावादी मूक आंदोलनामुळे परिस्थिती कुठून कुठे चालली आहे, याची जाणीव होते. देशातील एकूण वातावरण अशा गोष्टींसाठी तापले. तर आपल्या देशातील शांतता भंग होऊ शकते. संसदेने पारित केलेल्या कायद्यातील अनेक तरतुदी त्रुटीपूर्ण आहेत. असे इतर कोणी नाही तर सर्वोच्च न्यायालय म्हणते. देशाची न्यायपालिका निष्पक्ष राहिली पाहिजे आणि न्याय पालिकेचा निर्णय संविधानला धरूनच करता येतो. हे मुद्दाम अधोरेखित करणे आता गरजेचे आहे. बहुमताच्या बळावर संसदेत कोणताही कायदा संमत करता येतो. पण तो संविधानाच्या अनुरूप आहे की नाही. हे पाहणे केवळ सर्वोच्च न्यायालयालाच शक्य आहे. हा मुद्दा आता वेगवेगळ्या पातळीवर वादाचे कारण ठरणार असे दिसते आहे. वक्फच्या जमिनी अरबो-खरबो रुपयांच्या आहेत. त्यावर अनेक मठाधीश भूमाफियांसारखे बसलेले आहेत. हे सरकारचे म्हणणे अगदी रास्त आहे. पण या जमिनीचा उपयोग पुढे कसा करावा. याबाबतीत सरकार पक्ष आणि विरोधी पक्ष यांनी समन्वय साधणे आता नितांत गरजेचे झालेले आहे. चंद्राबाबू नायडूंचा पक्ष, नितीश कुमार यांचा पक्ष, चिराग पासवान यांचा पक्ष, चौधरी चरणदास यांचा पक्ष यांच्यातही बरीच धुसफूस आहे. याशिवाय महाराष्ट्रातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस आणि इतर छोटेमोठे पक्षही मुस्लिमांच्या मतामुळे निवडून येत असतात. त्यामुळे ते नाराज झाले. तर या पक्षांना आपले चंबूगबाळे आवरावे लागणार की काय, हा सुद्धा विचारणीय प्रश्न आहे. आपल्यासारख्या बहुभाषिक, बहुधर्मीय, बहुप्रांत असलेल्या देशाला या परस्परांतील द्वेषापासून वाचवणे गरजेचे आहे. सरकारी पक्षाने आपल्या भात्यातून तीर काढून तो डागून दिला आहे. त्यामुळे आता प्रस्थापित कायद्यात काही बदल करता येईल काय. याचे उत्तर सरकारला द्यायचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने काही महत्त्वाच्या तरतुदींना स्थगिती दिली. तर या कायद्याचे बारा वाजू शकतात. हे सर्वज्ञात आहे. सरकारलाही हे परवडण्यासारखे नाही. अशा वातावरणात ३० एप्रिल रोजी हैदराबाद मध्ये सर्वपक्षीय ब्लॅकआउट होणार आहे. त्याचे लोण इतरत्र पसरू न देणे. यासाठी सरकारला पुढाकार घ्यावाच लागेल. त्यामुळे या प्रश्नावर सरकार आणि विरोधी पक्षांनी सकारात्मक चर्चा करून समन्वय राखला पाहिजे. सद्यस्थितीमध्ये तेच महत्त्वाचे आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# महाराष्ट्रात कुठेही हिंदी भाषा लादली जात नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २० :

महाराष्ट्रात सध्या मराठी आणि हिंदी भाषेचा वाद सुरू आहे. हिंदीच्या सक्तीला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना पत्र देखील पाठवले आहे.

या पत्रातून त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. यावर तोडगा काढण्याची देखील मागणी या पत्रातून करण्यात आली आहे. या सगळ्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. हिंदी भाषा कुठेही लादली जात नाहीये, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.




पत्रकारांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मराठीच्या ऐवजी हिंदीची सक्ती करण्यात आलेली नाही. तीन भाषा शिकणे अनिवार्य आहे.

त्यातील दोन भारतीय भाषा असल्या पाहिजेत. आता आपल्याकडे दोन भाषा कोणत्या तर एक मराठी आहेच त्यासोबत आपण हिंदी भाषा घेतली आहे. मल्याळम किंवा इतर अशा भाषा ठेवल्या तर त्याचे शिक्षक आपल्याकडे उपलब्ध नाहीत. तसेच कोणाला हिंदीच्या व्यतिरिक्त दुसरी भाषा शिकायची असेल तर आम्ही त्याची सोय करू. २० च्या वर विद्यार्थी असतील तर शिक्षक दिला जाईल, कमी असतील तर ऑनलाईन पद्धतीने भाषा शिकवली जाईल.

पण हिंदी लादण्याचा प्रयत्न होत आहे, हे म्हणणे चुकीचे आहे. मला एका गोष्टीचे वाईट वाटते, आपण आपल्या देशाच्या हिंदी भाषेला विरोध करतो आणि इंग्रजी भाषेचे गोडवे गातो, अशी खंत देखील यावेळी बोलताना फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.

# रामनवमीनिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीत राडा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० :

मुंबई येथील वडाळा येथे रामनवमीनिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीमध्ये जोरदार राडा झाल्याचे समोर आले आहे. पोलिस आणि विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते आमनेसामने आले होते. पोलिसांनी मारहाण तसेच शिवीगाळ केल्याचा देखील आरोप कार्यकर्त्यांकडून करण्यात आला आहे. पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जमध्ये अनेक कार्यकर्ते जखमी देखील झाल्याचे समजते. यावेळी पोलिसांनी काही कार्यकर्त्यांना ताब्यात देखील घेतले आहे. परवानगी नसताना ही रॅली काढण्यात आल्याने हा राडा झाल्याचे बोलले जात होते.

रामनवमी निमित्त विश्व हिंदू परिषदेकडून शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेला पोलिसांनी परवानगी नाकारली होती. पोलिसांची परवानगी नसताना देखील ही शोभायात्रा विश्व हिंदू परिषदेकडून काढण्यात आली. त्यामुळे पोलिस आणि विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते यांच्यात तणाव निर्माण झाला होता. तसेच यावेळी पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचाही आरोप कार्यकर्त्यांनी केला आहे. तसेच अनेकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

## चंद्रपूरमध्ये सर्वाधिक ४४.६ अंश तापमान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

विदर्भात उन्हाची तीव्रता वाढली आहे. रविवारी चंद्रपूर जिल्ह्यात सर्वाधिक ४४.६ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. नागपुरात पारा ४४ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचला. सकाळी ९ वाजल्यापासूनच कडक उन्हाचा सामना करावा लागत आहे. दुपारी १२ ते ४ या कालावधीत नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. विदभार्तील इतर शहरांमध्येही उष्णतेची लाट जाणवत आहे. ब्रम्हपुरी आणि अमरावतीत ४४.४ अंश, वर्धा येथे ४४.०, अकोला येथे ४४.३, यवतमाळ येथे ४३.६, गडचिरोली येथे ४२.६, गोंदिया येथे ४२.२ आणि वाशिम येथे ४२.६ अंश सेल्सियस तापमान नोंदवण्यात आले. बुलढाणा मात्र तुलनेने थंड राहिले असून तेथे ३९.६ अंश सेल्सियस तापमान नोंदवण्यात आले.



शनिवारी नागपूरमध्ये ४४.७ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले होते. त्याच दिवशी अकोला येथे ४४.३ अंश, तर वर्धा आणि चंद्रपूर येथे ४४ अंश सेल्सियस तापमान नोंदवण्यात आले. प्रादेशिक हवामान केंद्राने पुढील काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली आहे.

## रणजित कासलेंवर तिसरा गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी,
बीड, दि. २० :

बीड येथील निलंबित पोलिस उपनिरीक्षक रणजित कासले यांच्याविरोधात तिसरा गुन्हा दाखल झाला आहे. अंबाजोगाई येथील एका व्यवसायिकाकडून ६ लाख रुपये घेतले पण वारंवार मागणी करून उसने घेतलेले पैसे परत केले नाहीत, असा आरोप करत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आईच्या उपचारासाठी म्हणून हे पैसे घेतले असल्याचे सांगण्यात येत आहे.

अधिकची माहिती अशी की, रणजित कासले जेव्हा अंबाजोगाई येथे कार्यरत होते, तेव्हा त्यांची सुधीर चौधरी नामक व्यवसायिकाशी मैत्री होती. या मैत्रीतून रणजित कासले यांनी आईच्या उपचारासाठी म्हणून ६ लाख रुपये उसने घेतले होते. पण वारंवार मागणी करूनही पैसे परत न केल्याने सुधीर चौधरी यांच्या तक्रारीनुसार अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांत रणजित कासले यांनी व्हिडिओ शेअर करत अनेक खळबळजनक दावे केले होते. धनंजय मुंडे यांच्यावर देखील गंभीर आरोप त्यांनी केले होते. तसेच आपल्याला निवडणुकीच्या काळात ईव्हीएम मशीनपासून दूर राहण्यासाठी वाल्मीक कराडच्या कंपनीकडून १० लाख रुपये दिले होते, असेही कासले यांनी सांगितले होते. सध्या रणजित कासले शिवाजीनगर पोलिसांच्या कोठडीत आहे. रणजित कासले यांनी केलेल्या दाव्यावर वाल्मीक कराडची कंपनी बाळूमामा कन्स्ट्रक्शन कंपनीच्या वतीने स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

# शिक्षण संस्थेच्या संचालकास अटक

### बोगस शालार्थ आयडी प्रकरणात ७ वा आरोपी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २० :

बोगस शालार्थ आयडी घोटाळ्यात सदर पोलिसांनी आणखी एकाला अटक केली आहे. यावेळी एका शिक्षण संस्थेचा संचालक पोलिसांच्या हाती लागला आहे. पराग पुडकेची त्यानेच आरोपी शिक्षक महेंद्र भाऊराव म्हैसकर (४४) याच्याशी भेट घालून दिली होती. या प्रकरणात ६ आरोपींना आधीच अटक झाली आहे. सातवा आरोपी राजू केवलराम मेश्राम (५९) रा. अजुर्नी मोरगाव, गोंदिया आहे.

राजू हा पूर्वी पिंपळगाव येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात लिपिक होता. नंतर त्याने स्वतःची डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था सुरू केली. या शाळेत राजूची पत्नी मुख्याध्यापिका आहे. म्हैसकर या संपूर्ण घोटाळ्याचा म्होरक्या असल्याचे सांगण्यात येत आहे. बहुतांश शिक्षकांचे बोगस प्रस्ताव म्हैसकर याने बनविल्याचे सांगण्यात येत आहे. उल्लेखनिय आहे की, सदर पोलिसांनी वाघमारे नावाच्या व्यक्तीने दिलेल्या तक्रारीवरून शिक्षण उपसंचालक उल्हास नरड, वादग्रस्त मुख्याध्यापक पराग नाना पुडके, माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयाचा अधीक्षक नीलेश शंकर मेश्राम, शिक्षण उपसंचालक कार्यालयाचा शिक्षण उपनिरीक्षक संजय शंकर दुधाळकर आणि लिपिक सूरज पुंजाराम नाईक यांना अटक केली होती.

पराग पुडकेच्या बोगस नियुक्तीच्या चौकशीदरम्यान महेंद्र म्हैसकर याचे नाव पुढे आले. त्याला पोलिसांनी अटक केली आहे. चौकशीत म्हैसकरने सांगितले की, अजुर्नी मोरगाव येथील शिक्षण संस्था संचालक राजू मेश्रामने त्याची पराग पुडके याच्याशी भेट घालून दिली होती. मेश्रामला माहिती होते की, म्हैसकर हे काम करण्यात तरबेज आहे. त्याच्या माध्यमातून पुडकेची भेट म्हैसकर याच्याशी झाली. म्हैसकर याने त्याचा प्रस्ताव बनविण्यासाठी २.५० लाख रुपये घेतले होते. राजूला कमिशनचे २५ हजार रुपये देण्यात आले. राजूचे नाव पुढे येताच सदर पोलिसांनी शनिवारी रात्री अजुर्नी मोरगाव गाठले. राजूला अटक करून नागपुरात आणले. म्हैसकरची कोठडी सोमवारी संपल्यानंतर पुन्हा त्याला न्यायालयात हजर केले जाईल. तर नरड आणि सूजर नाईक हे सायबर पोलिसांच्या ताब्यात आहेत. विशेष म्हणजे शनिवारी सदर पोलिसांनी म्हैसकरच्या घरावर धाड टाकली होती. या दरम्यान ५६ शिक्षकांची कागदपत्रे मिळाली होती. तसेच २२ बोगस शिक्षकांच्या प्रस्तावाचे कागदपत्रही पोलिसांच्या हाती लागले. यावरून स्पष्ट होते की, म्हैसकर याच्यासोबत मिळून शिक्षण विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी संपूर्ण रॅकेट चालवत होते.

# ज्या पक्षाने तुम्हाला मोठ केले त्याच्यावर आरोप करायचे नसतात : नाना पटोले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, २० :

काँग्रेस पक्षात मला सातत्याने डावलण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचा आरोप काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी केला आहे. काँग्रेस पक्षाच्या राजीनामा दिल्यानंतर त्यांनी आज आपण भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे अधिकृत जाहीर केले आहे. यावर आता काँग्रेस नेते नाना पटोले यांनी प्रतिक्रिया देत संग्राम थोपटे यांना सल्ला दिला आहे. नाना पटोले संग्राम थोपटे यांना उद्देशून म्हणाले, ज्या पक्षाने तुम्हाला मोठ केले, नावारुपाला आणले त्याच्यावर आरोप करायचे नसतात. जिकडे तुम्ही जाऊ पाहता तिकडे फार अंधार आहे, असे नाना पटोले यांनी म्हटले आहे.



दरम्यान, २२ एप्रिल रोजी आपण भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे संग्राम थोपटे यांनी जाहीर केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा २२ एप्रिल रोजी मुंबईत होणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे.

काँग्रेस पक्षात आपल्याला अनेकदा डावलण्यात आले असल्याचा आरोप संग्राम थोपटे यांनी केला आहे. त्यामुळे दुःख वाटत आहे. मात्र तालुक्याच्या विकासासाठी, तालुक्यातील प्रश्न सोडवण्यासाठी हा निर्णय आम्ही घेतला असल्याचे संग्राम थोपटे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

## जमिनीच्या वादातून तरुणाचा खून

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २० :

जमिनीच्या वादातून एका तरुणाच्या डोक्यात दगड घालून त्याचा निर्घुण खून करण्यात आल्याची घटना कात्रजमधील संतोषनगर परिसरात घडली. याप्रकरणी सराईत गुन्हेगार आरोपी विरुद्ध आंबेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. शुभम सुभाष चव्हाण असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी सराईत गुन्हेगार अमर साकोरे याच्यासह तीन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुभम कात्रजमधील संतोषनगर भागातून जात होता. त्यावेळी आरोपी अमर आणि त्याच्याबरोबर असलेल्या साथीदारांनी त्याला जबरदस्तीने अडविले. आरोपींनी त्याला शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली.

# २२ एप्रिलला मुंबईत संग्राम थोपटेंचा भाजप प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २० :



काँग्रेस पक्षात मला सातत्याने डावलण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचा आरोप काँग्रेसचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी केला आहे. काँग्रेस पक्षाच्या राजीनामा दिल्यानंतर त्यांनी आज आपण भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे अधिकृत जाहीर केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत प्रवेश सोहळा २२ एप्रिल रोजी मुंबईत होणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले. काँग्रेस पक्षात आपल्याला अनेकदा डावलण्यात आले असल्याचा आरोप संग्राम थोपटे यांनी केला आहे. काँग्रेस पक्षात अनेक वर्षांपासून मी आणि माझ्या वडिलांनी देखील काम केले आहे. त्यामुळे दुःख वाटत आहे. मात्र तालुक्याच्या विकासासाठी, तालुक्यातील प्रश्न सोडवण्यासाठी हा निर्णय आम्ही घेतला असल्याचे संग्राम थोपटे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. मी कोणाच्याही दबावाला कधी बळी पडलो नाही. लोकसभा निवडणुकीत देखील तुम्ही पाहिले असेल की, भोर तालुक्यात लोकसभेच्या निवडणुकीत देखील महा विकास आघाडीचे काम आम्ही प्रामाणिकपणे केले होते. महा विकास आघाडीचा धर्म पाळत आम्ही महा विकास आघाडीचे काम केले.

# उद्धव ठाकरेंच्या राज ठाकरेंसमोर कोणत्याही अटी-शर्ती नाहीत : संजय राऊत

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २० :



राज ठाकरे यांनी महाराष्ट्र हिताचा विषय मांडला. त्याला उद्धव ठाकरे यांनी ताबडतोब प्रतिसाद दिला. तो प्रतिसाद देखील महाराष्ट्राच्या हिताचा होता. मात्र, ठाकरे बंधूंनी एकत्र यावे, असे काही लोकांना वाटत नसल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. महाराष्ट्र हितासाठी दोन भाऊ एकत्र येण्यावर सहमती होत आहे. तर त्यामध्ये वाद करण्यासारखे काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तसेच उद्धव ठाकरेंनी राज ठाकरे यांच्या समोर कोणत्याही अटी-शर्ती ठेवलेल्या नसल्याचा दावा देखील संजय राऊत यांनी केला आहे.

या संदर्भात संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्र हिताच्या फॉर्मुलामध्ये भारतीय जनता पक्ष बसत नाही. त्यांच्यासोबत असलेले लोक या फॉर्मुलात बसत नाही. त्याला तर कोणी अटी आणि शर्ती म्हणत असतील, तर त्यांनी थोडा विचार करावा. आमची भूमिका स्पष्ट आहे. आम्ही महाराष्ट्रासाठी काम करायला तयार आहोत. माझ्यासारखा माणूस देखील त्यासाठी सकारात्मक आहे.

मी अनेक वर्ष बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे, राज ठाकरे यांच्यासोबत काम केले आहे. मी श्रीकांत ठाकरे सोबत देखील एकत्र काम केले आहे. आता मी आदित्य सोबत देखील काम करत आहे. मात्र महाराष्ट्र हित कशात आहे? मराठी माणसांचा स्वाभिमान कशात आहे? हे आम्हाला माहिती आहे. बाळासाहेबांचे ध्येय महाराष्ट्र आणि मराठी माणूस होता. त्यासाठी दोन भाऊ एकत्र येत असतील तर चांगले आहे. तर आम्ही त्यांचे स्वागतच केले आहे. केवळ महाराष्ट्र द्रोही असलेल्या लोकांना पंगतीला देखील बसू नका, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले असल्याचे संजय राऊत म्हणाले.

राज ठाकरे यांनी जे विधान केले आहे, त्यावर उद्धव ठाकरे यांनी प्रति विधान केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र निर्माण सेनेचे नेते काय बोलतात, त्यावर मी उत्तर देणार नाही. राज ठाकरे बोलल्यानंतर त्यावर बालू. राज ठाकरे यांच्या वक्तव्यावर उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका मांडली आहे. महाराष्ट्र हिताला सर्वोच्च प्राधान्य देत उद्धव ठाकरे यांनी आपली भूमिका मांडली असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

## हत्येला जबाबदार असणाऱ्या लोकांना निर्दोष सिद्ध करण्यासाठी प्रयत्न : सुप्रिया सुळे

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २० :

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय गेल्या काही दिवसांपासून चांगलेच चर्चेत आले आहे. तनिषा भिसे या गर्भवती महिलेचा उपचाराअभावी तसेच हलगर्जीपणामुळे मृत्यू झाल्याचा आरोप रुग्णालय प्रशासनावर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणातील स्त्रीरोग तज्ञ डॉ. सुश्रुत घैसास यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. असे असले तरी या प्रकरणात अद्यापही ठोस कारवाई होताना दिसत नाही. यावर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया देत आरोप केले आहेत.



प्रसारमाध्यमांशी बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, पहिल्या दिवशी मुख्यमंत्र्यांनी जे वक्तव्य केले होते आणि आज जे वक्तव्य केले आहे त्यात खूप फरक आहे. एका हत्येला जबाबदार असणाऱ्या लोकांना निर्दोष सिद्ध करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे, ते दुर्दैव आहे. अनेक अहवालांमध्ये न अडकता सत्य परिस्थिती काय आहे, ते समजून घेणे गरजेचे आहे. पुढे बोलताना सुप्रिया सुळे यांनी महाराष्ट्रात पाण्याची समस्या सुरू असून यावर भाष्य करत राज्यकर्त्यांना दोषी ठरवले आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या, जलजीवन मिशन नावाचा चांगला उपक्रम देशात राबवला जात आहे. परंतु राज्यात आणि देशात असणारे डबल इंजिन सरकार पाण्याचे नियोजन करू शकत नाही.

# हिंदी सक्तीच्या विरोधात मनसे आक्रमक

### सरसंघचालकांकडे केली पत्रातून मागणी

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २० :

महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यांपासून मराठी आणि अमराठी असा वाद दिसून येत आहे. त्यात राज्य सरकारने शैक्षणिक धोरणांतर्गत इयत्ता पहिलीपासून हिंदी विषय सक्तीचा करण्याचे जाहीर करण्यात आले आहे. याविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने नाराजी व्यक्त करत विरोध दर्शवला आहे. याच पार्श्वभूमीवर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना पत्र पाठवले आहे. यातून मोहन भागवत यांच्याकडे नाराजी व्यक्त केली आहे.



संदीप देशपांडे यांनी पाठवलेल्या पत्रात मराठ्यांचा इतिहास नमूद केला आहे. तसेच मराठ्यांनी जवळपास २०० वर्ष बहुतांश भारतावर राज्य केले आहे. मात्र मराठ्यांनी कधीच मराठी भाषा त्या त्या प्रांतांवर लादली नाही. इंग्रजांनी हिंदुस्थान मोघलांकडून नाही तर मराठ्यांकडून जिंकला. शिंदे ग्वालियरमध्ये, गायकवाड बडोद्यामध्ये, दक्षिणेत तंजावर येथे मराठ्यांचे राज्य होते. जवळ जवळ २०० वर्ष हिंदुस्थानवर मराठ्यांचे राज्य होते. गुगल नसताना सुद्धा त्यावेळी मराठ्यांना मराठी ही संपकार्ची भाषा करावीशी वाटली नाही. उलटपक्षी शिंदे हे ग्वाल्हेर येथे जाऊन सिंधिया झाले, असे या पत्रात म्हटले आहे.

पुढे संदीप देशपांडे यांनी लिहिले, मराठी माणूस हा सहिष्णु आहे. त्याचा गैरफायदा घेण्यात येत आहे. मराठी माणूस हा सुद्धा हिंदूच आहे. गुजराती, तामिळ बोलणार हा सुद्धा हिंदूच आहे. ख्रिस्ती धर्म वाढवण्यासाठी तामिळ, मल्याळम, कोंकणी ही बोलीभाषा आत्मसात करण्यात आली. हे सर्व सांगण्याचे कारण एकच आहे की धर्म वाढवायचा असेल टिकवायचा असेल तर सर्व भाषांना सामावून घेणे गरजेचे आहे. एका समूहाची भाषा दुसऱ्या समूहावर लादून धर्म वाढू शकत नाही. पाकिस्तानातील बंगाली बोलणारे मुसलमानांनी भाषेआधारीत स्वतंत्र राष्ट्र घेतले हा इतिहास ताजा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला एक वैचारिक अधिष्ठान आहे आणि ही संघटना विचारांच्या आधारावर उभी आहे. म्हणूनच हे सांगण्याचे धाडस करत आहोत. हिंदू धर्मामध्ये फूट पाडण्याच्या या कृतीला आपण चाप बसवाल हा आमचा ठाम विश्वास आहे, अशी अपेक्षा या पत्रातून व्यक्त करण्यात आली आहे.

# जर ठाकरे बंधू एकत्र आल्यास आनंदच: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई, दि.२० :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिक्रिया दिली आहे. जर राज आणि उद्धव ठाकरे हे बंधू आपापसातील मतभेद विसरून एकत्र येत असतील, तर आम्हाला आनंदच आहे. यात वाईट वाटण्याचे कोणतेही कारण नाही, असे फडणवीस म्हणाले. तथापि, त्यांनी आगामी मुंबई महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीच विजयी होईल, असा विश्वासही व्यक्त केला.

राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना एकत्र येण्याची साद घातली असून, उद्धव यांनी सकारात्मक प्रतिसाद देत भाजपला पाठिंबा न देण्याची अट ठेवली आहे. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांनी सूचक वक्तव्य केले, एकाने साद दिली, दुसऱ्याने प्रतिसाद दिला, पण शर्तीही ठेवल्या आहेत. त्यावर मी काय बोलणार? त्यांनाच विचारा. प्रसारमाध्यमांतच यावर जास्त विचारमंथन सुरू आहे. ठाकरे बंधूंची एकजूट महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे बदल घडवू शकते, पण महायुतीच्या विजयावर फडणवीस ठाम आहेत.

# ठाकरे कुटुंबाच्या एकजुटीला रोहित पवारांचे समर्थन: पवार कुटुंबालाही एकत्र येण्याचे संकेत

**मुंबई, दि.२० :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी ठाकरे कुटुंबाच्या संभाव्य एकजुटीचे स्वागत करत मराठी अस्मितेसाठी सर्व कुटुंबांनी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. सोशल मीडियावर पवार म्हणाले, मराठी अस्मितेला नख लावू पाहणाऱ्या महाराष्ट्रद्रोही शक्तीच्या विरोधात ठाकरे कुटुंब एकत्र येत असेल, तर मराठी मनासाठी हा सुवर्णक्षण असेल. केवळ ठाकरे कुटुंबानेच नाही, तर सर्वच कुटुंबांनी महाराष्ट्रधर्म जपण्यासाठी एकत्र यायला हवे. यातच महाराष्ट्राचे हित आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना एकत्र येण्याची साद घातली असून, उद्धव यांनी सकारात्मक प्रतिसाद देत भाजपला पाठिंबा न देण्याची अट ठेवली आहे. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी शरद पवार आणि अजित पवार यांना टॅग करत पवार कुटुंबाच्या एकजुटीचे सूचक संकेत दिले. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर पवार कुटुंबाच्या एकत्र येण्याच्या चर्चांना त्यांच्या वक्तव्याने बळ मिळाले आहे.

ठाकरे आणि पवार कुटुंबांचे महाराष्ट्राच्या राजकारणातील वजन लक्षात घेता, ही एकजूट आगामी मुंबई महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर परिणाम करू शकते. रोहित पवार यांच्या आवाहनाने मराठी अस्मितेचा मुद्दा प्रामुख्याने तापण्याची शक्यता आहे. त्यांच्या या वक्तव्याने राजकीय मतभेद बाजूला ठेवून मराठी हितासाठी एकजुटीचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

# तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दुर्गम भागांत आरोग्यसेवा पोहोचवा: मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, दि.२० :** महाराष्ट्राला आरोग्यसेवांचे महत्त्वपूर्ण केंद्र बनवण्याचा प्रयत्न सुरू असून, दर्जेदार आरोग्यसेवा समाजाच्या शेवटच्या व्यक्तीपर्यंत, विशेषतः अतिदुर्गम भागांत पोहोचली पाहिजे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. तंत्रज्ञान आणि डॉक्टर, तज्ञ यांच्या सहाय्याने हे शक्य आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. २२व्या मुंबई लाइव्ह इंडोस्कोपी अवॉर्ड २०२५ च्या वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी डॉ. अमित मायदेव, डॉ. तरंग ग्यानचंदानी आणि देश-विदेशातीलडॉक्टर उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, प्रत्येक व्यक्तीला सुलभ, परवडणारी आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळणे गरजेचे आहे. गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्रात १० नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन झाली असून, डॉक्टर आणि आरोग्यसेवकांची गरज वाढली आहे. इंडोस्कोपी क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानासाठी यावेळी डॉक्टरांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्रातील डॉ. राधिका चव्हाण यांना वूमन इन इंडोस्कोपी, चंडीगडच्या डॉ. सुरेंद्र राणा यांना इंडोस्कोपी एज्युकेटर, ओडिशाचे डॉ. आशुतोष मोहपात्रा यांना लीडर फ्रॉम टायर २/३ सिटीज, राजस्थानचे डॉ. मुकेश कल्ला यांना लीडरशिप, चंडीगडचे डॉ. जयंत सामंता यांना इम्पॅक्टफुल पब्लिकेशन, महाराष्ट्राचे डॉ. अमोल बापये आणि तेलंगणाचे डॉ. मोहन रामचंदानी यांना टेक्निकल स्कील आणि महाराष्ट्राचे डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांना इंडोस्कोपी फॉर सर्जन पुरस्कार प्रदान झाले.

# एटीएमधून रोकड काढणाऱ्या ज्येष्ठाची फसवणूक



**पुणे :** एटीएमधून रोकड काढणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाची चोरट्याने५० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना नवी पेठेतील शास्त्री रस्त्यावर घडली. याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार ६८ वर्षीय ज्येष्ठ नागरिक धनकवडी भागात राहायला आहेत. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# राज्यात उष्णतेचा कहर;

# मुंबईतही तापमान वाढण्याचा इशारा

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २० :**



राज्यात उन्हाचा चटका दिवसेंदिवस वाढत चालला आहे. अनेक भागांत तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. मुंबईत तुलनेने तापमान जरी कमी असले तरी सोमवारपासून तापमानात वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे पुढचे दोन ते तीन दिवस मुंबईकरांना उकाड्याबरोबरच उन्हाचा तडाखाही सहन करावा लागणार आहे. मुंबईत सध्या कमाल तापमान ३२ते ३३ अंशादरम्यान आहे. मात्र वाढती आर्द्रता आणि दमट हवामान यांमुळे उष्मा अधिक जाणवत आहे. दिवसभराचे तापमान कमी असल्यामुळे मागील काही दिवसांपासून उन्हाच्या तडाख्यापासून मुंबईकरांना दिलासा मिळाला आहे. मात्र, आता पुन्हा उन्हाचा चटका सहन करावा लागणार आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सोमवारपासून साधारण बुधवारपर्यंत मुंबईच्या तापमानाचा पारा चढा राहणार आहे. त्यामुळे उकाडा आणि उन्हाचा ताप नागरिकांना सहन करावा लागणार आहे. या दिवसांत तापमानात २ ते ३ अंशांनी वाढ होण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यात विदर्भ, मराठवाड्यात उष्णतेची लाट अनुभवायला मिळत आहे. वनसंपदा वाचवण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणेचा वापर; गणेश नाईक यांचे आदेशएका रीलसाठी ओलांडली मर्यादा! भर रस्त्यात दोन तरुणींनी काय केलं पाहा; संतापजनक महाराष्ट्राची हास्यजत्रामधील शिवाली परबने केले बोल्ड अंदाजात फोटोशूटनागपूर, चंद्रपूर, अकोला, जळगाव आदी शहरांत ४० अंशांचा पुढे तापमान नोंदले आहे. शनिवारी नागपूर येथे सर्वाधिक ४४.७. अंश सेल्सिअस इतकी कमाल तापमानाची नोंद करण्यात आली होती. या तापमानासह नागपूर देशातील सर्वाधिक उष्ण शहर ठरले आहे. राजस्थानमध्ये गेल्या काही दिवसांपासून उष्णतेच्या लाटेसदृश स्थिती आहे. राजस्थानमधील उष्ण वारे गुजरातवरुन राज्यात येत आहेत. याचाच परिणाम म्हणून पुढील चार पाच दिवस राज्याच्या तापमानात वाढ होणार आहे. मुंबईतही ही वाढ पहायला मिळणार आहे. त्यामुळे मुंबईकरांना पुढील दोन तीन दिवस असह्य उकाडा आणि उन्हाचा तडाखा सहन करावा लागणार आहे.हेही वाचाहिंदीची सक्ती मुळासकट उखडून फेकू, उद्धव ठाकरे यांची रोखठोक भूमिकाकाय काळजी घ्यावीदिवसा उष्णता असल्यास घराच्या खिडक्या आणि दरवाजे काही वेळापुरते बंद करावे.

# कोस्टल रोडवरील अपघातात ट्रॉफिक वॉर्डनचा मृत्यू

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २० :** धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मार्गावर (कोस्टल रोड) शनिवारी झालेल्या अपघातात ३८ वर्षीय ट्राफिक वॉर्डनचा मृत्यू झाला. कोस्टलरोडवरून वाहतूकीचे नियम मोडून टेम्पो गेल्यामुळे पाहणी करण्यासाठी वॉर्डन दुचाकीवरून गेला होता. त्यावेळी त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले व तो समुद्रात पडला. गावदेवी पोलिसांच्या हद्दीतील अमरसन गार्डनजवळ हा अपघात घडला. याप्रकरणी पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत. रफिक वजीर शेख(३८) असे मृत वॉर्डनचे नाव असून रफिक शेख हे शनिवारी मुंबई कोस्टल रोडवर कर्तव्यावर होते. सायंकाळी साडेपाच वाजता धर्मवीर संभाजी राजे कोस्टल रोडवर टाटा गार्डनहून वरळीकडे एक टेम्पो वेगात चालला होता. अवजड वाहनांना कोस्टल रोडवर



बंदी असल्यामुळे टेम्पो थांबवण्यासाठी ट्रॅफिक वॉर्डन रफिक शेख यांनी टेम्पोला थांबवण्यास सांगितले. पण तो निघून गेला.

काहीवेळाने शेख यांनी आपल्या दुचाकीवरून त्याचा पाठलाग सुरू केला. कोस्टल रोडवरील एका वळणावर शेख यांचे स्कूटरवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे दुचाकी रस्त्याच्या कडेला असलेल्या सिमेंट दुभाजकाला धडकली. धडकेनंतर शेख हे पुल-ावरून समुद्रात फेकले गेले. घटनेची माहिती मिळताच अग्नीशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन शेख यांना पाण्यातून बाहेर काढले.

# पिंपरी : मुळा नदीपात्रात नागरिकांचा ठिय्या

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि.२० :** नदी सुधारच्या कामात झाडे तोडली जात असल्याचा आरोप करीत पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील शंभर पेक्षा अधिक पर्यावरणप्रेमी, सामाजिक संघटनांनी मुळा नदीकाठी सुरू असलेल्या नदी सुधार प्रकल्पाला विरोध केला आहे. मुख्यमंत्र्यांसह इतर राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते, महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याकडे नदी स्वच्छतेबाबत साकडे घातल्यानंतर काहीही हाती न लागल्याने हतबल झालेल्या पर्यावरण प्रेमी नागरिकांनी आज (रविवारी) सकाळी मुळा नदीपात्रात आंदोलन केले.पिंपळे निलख स्मशानभूमी जवळ मुळा नदीपात्रात रविवारी आंदोलन करण्यात आले. सुमारे २५ जणांनी नदीपात्रात उतरून ठिय्या आंदोलन केले. शहरातील पवना इंद्रायणी आणि मुळा नद्यांची स्वच्छता करणे आणि नदी सुधार प्रकल्प थांबविण्याच्या आग्रही मागणीसाठी हे आंदोलन मागील काही दिवसांपासून केले जात आहे. या आंदोलनाला पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील शंभर पेक्षा अधिक पर्यावरणप्रेमी सामाजिक



संघटनांनी पाठिंबा दिला आहे. नदी सुधार प्रकल्पाचा निषेध करण्यासाठी ४ मार्च रोजी चापेकर चौक, चिंचवड येथे पहिले आंदोलन झाले. शेकडो शेकडो नागरिकांनी एकत्र येत मानवी साखळी केली.१५ मार्च रोजी बालेवाडी येथे दुसरे आंदोलन झाले.२३ मार्च रोजी पिंपळे सौदागर येथे पुन्हा मानवी साखळी करत नदी सुधार प्रकल्पाचा विरोध करण्यात आला. २४ मार्च रोजी दुर्गादेवी टेकडीच्या पायथ्याला शेकडो नागरिकांनी स्वच्छ नदीची मागणी करत वृक्षतोडीच्या विरोधात मानवी साखळी करून आंदोलन केले. २० एप्रिल रोजी पिंपळे निलख येथे नदीपात्रात उतरून आंदोलन करण्यात आले. मुळा नदीच्या काठावर मोठ्या प्रमाणात पशुपक्षी आणि प्राण्यांचा अधिवास आहे. नदी सुधार प्रकल्पात नदीकाठच्या अनेक झाडांची कत्तल केली जात आहे. यामुळे या पशुपक्षी आणि प्राण्यांचा अधिवास संपुष्टात येणार आहे. तसेच नदीपात्र अरुंद होऊन भविष्यात पूरस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्यात नदी सुधार प्रकल्पामध्ये पाण्याच्या स्वच्छतेला दुय्यम स्थान दिले गेल्याने नागरिकांमध्ये कमालीची नाराजी आहे. त्यामुळे सातत्याने आंदोलने केली जात आहेत. पुढील आठवडाभरात हा प्रकल्प थांबवला नाही तर २७ एप्रिल (रविवारी) पुन्हा पिंपळे निलख येथे तीव्र आंदोलन केले जाणार असल्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

# उन्हाळ्यामुळे फळभाज्यांची आवक कमी; काकडी, फ्लॉवर, ढोबळी मिरची, गाजर, घेवड्याच्या दरात वाढ

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि.२० :** घाऊक बाजारात गेल्या आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांची आवक कमी झाली. उन्हाच्या कडाक्यामुळे फळभाज्यांची आवक कमी होत असून, काकडी, फ्लॉवर, ढोबळी मिरची, गाजर, घेवड्याच्या दरात वाढ झाल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून मिळून ४० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, गुजरात, आंध्र प्रदेशातून मिळून १० ते१२ टेम्पो हिरवी मिरची, कर्नाटक, गुजरातमधून मिळून ४ ते ५ टेम्पो कोबी, कर्नाटकातून २ ते ३ टेम्पो घेवडा, आंध्र प्रदेश, तामिळनाडूतून मिळून २ ते३ टेम्पो शेवगा, राजस्थानातून १ टेम्पो गाजर, हिमाचल प्रदेशातून ५ ते ६ ट्रक मटार, कर्नाटकातून २ टेम्पो भुईमूग शेंग, तसेच टेम्पो पावटा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटकातून४ ते५ टेम्पो तोतापुरी कैरी, गुजरात आणि मध्य प्रदेशातून १४ ते १५ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाली, अशी माहिती मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.पुणे विभागातून सातारी आले ५०० ते ६०० गोणी, भेंडी ६ ते ७ टेम्पो, गवार ३ ते ४ टेम्पो, टोमॅटो ८ ते १० हजार पेटी, हिरवी मिरची



४ ते ५ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, काकडी ७ ते ८ टेम्पो, कोबी ५ ते ६ टेम्पो, फ्लॉवर ८ ते १० टेम्पो, तांबडा भोपळा १०ते १२ टेम्पो, कांदा ते ८० ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ३० ते ३५ ट्रक बटाट्याची आवक झाली. कोथिंबिर, मेथीच्या दरात वाढकोथिंबिर,मेथीच्या दरात गेल्या आठवड्याच्या तुलनेत वाढ झाली. अन्य पालेभाज्यांचे दर स्थिर आहेत.

तरकारी विभागात कोथिंबीर हजार जुडी, मेथीच्या ४० हजार जुडींची आवक झाली. अशी माहिती तरकारी विभागातील व्यापाऱ्यांनी दिली. घाऊक बाजारात पालेभाज्यांचे शेकड्याचे दर पुढीलप्रमाणे कोथिंबीर-८०० ते १५००, मेथी १२०० ते २०००, शेपू ८०० ते १०००, कांदापात- ८०० ते १५००, चाकवत ५०० ते ८००, करडई- ३०० ते७०० , पुदिना ३०० ते ५००, अंबाडी ३०० ते ६००, मुळे ८०० ते १५००, राजगिरा- ४०० ते ६००, चुका ५०० ते ८००, चवळई- ३००-६०० पालक-८००-१२००

# ईस्टर संडे प्रार्थनेने साजरा, चाळीस दिवसांच्या उपवासाची सांगता

■ **महासागर प्रतिनिधी,**
**पुणे, दि.२० :** खिश्चन बांधवांचा पवित्र सप्ताह आणि चाळीस दिवसांच्या उपवासाची सांगता ईस्टर संडेच्या प्रार्थनेने रविवारी झाली. येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थान दिवसाच्या निमित्ताने कॅथलिक आणि प्रोटेस्टंट संप्रदायांच्या चर्चमध्ये धर्मगुरुंच्या उपस्थितीत खिचन बांधवांनी विशेष प्रार्थना केली.भल्या पहाटे काढण्यात आलेल्या पुनरुत्थान दिंड्यांनी ईस्टर संडेची सुरुवात झाली. ठिकठिकाणच्या दिंड्यांमध्ये भाविक सहकुटुंब सहभागी झाले होते. सकाळी सहाच्या सुमारास प्रभुभोजनाने या दिंड्यांची सांगता झाली. संगीत महाविधी नंतर भाकरी आणि द्राक्षांच्या रसाचे वाटप धर्मगुरुंनी केले. त्यासाठी भाविकांनी चर्चमध्ये गर्दी केली होती. दोन्ही संप्रदायांमध्ये हा विधी परंपरेनुसार पार पडला. प्रभातफेरीनंतर धर्मगुरूंनी प्रभू येशूच्या पुनरुत्थानाची कथा भाविकांना सांगितली. उपासनेसाठी चर्चमध्ये सभासद, महिला मंडळ, तरुण संघ व संडे स्कूलचे शिक्षकही उपस्थित होते. समाजमाध्यमांवरही ख्रिस्त बांधवांनी नातेवाईक आणि मित्रमंडळींना हॅपी ईस्टरचे संदेश पाठविले. काही चर्चमध्ये रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी शिबिर, आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# पत्रकारांची लेखणी म्हणजे रॉकेट आहे इस्रोच्या वरिष्ठ शास्त्रज्ञ माधवी ठाकरे

## व्हॉईस ऑफ मिडियाच्या राज्यस्तरीय महिला पत्रकार अधिवेशनाचा उत्साहात समारोप



■ **महासागर प्रतिनिधी,**
**नाशिक , दि. २० :**

पत्रकारांची लेखणी म्हणजे रॉकेट आहे. ती सामान्य जनतेच्या समस्या उंच आकाशात नेत सरकारच्या आणि समाजाच्या निदर्शनास आणते, असे स्फूर्तीदायक उद्गार इस्रोच्या वरिष्ठ शास्त्रज्ञ माधवी ठाकरे यांनी काढले. त्या व्हॉईस ऑफ मिडियाच्या राज्यस्तरीय महिला पत्रकार अधिवेशनाच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

या अधिवेशनात शास्त्र, पत्रकारिता आणि स्त्री सशक्तीकरण यांचा संगम पाहायला मिळाला. प्रत्येक स्त्रीने स्वतःसाठी मी टाइम राखून ठेवणे गरजेचे आहे. कारण ती रोज इतरांसाठी झटत असते. स्वतःच्या छंदांना वेळ दिला पाहिजे, अशा प्रेरणादायी विचारांनी माधवी ठाकरे यांनी महिला पत्रकारांना सशक्ततेचा मंत्र दिला.चांद्रयान- मोहिमेच्या यशाबद्दल सांगताना त्या म्हणाल्या, चांद्रयान- यशस्वी झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी थेट ग्रीसहून आमच्याकडे आले. इस्रोमध्ये त्या वेळी १०० महिला शास्त्रज्ञ उपस्थित होत्या. तो आमच्यासाठी गौरवाचा क्षण होता. त्यांनी सांगितले की, विज्ञानप्रवासात यश मिळवताना डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा प्रभाव, पालकांचे संस्कार आणि स्वतःची जिद्द हेच तीन महत्त्वाचे आधारस्तंभ ठरले.

माधवी ठाकरे यांनी सांगितले की, सकारात्मक पत्रकारिता ही काळाची गरज आहे. समाज कोणत्या दिशेने विचार करतो, हे पत्रकाराच्या मांडणीवर ठरतं. त्यामुळे समाजमन घडवणारी ही लेखणी जबाबदारीने वापरणे अत्यंत गरजेचे आहे.या अधिवेशनात महिला पत्रकारांसाठी विविध उपक्रम राबवण्यात आले. महिला पत्रकारांसाठी विशेष कार्यशाळा, आरोग्य तपासणी शिबिर, सामूहिक संवाद व्यासपीठ, आणि प्रेरणादायी अनुभवांची देवाणघेवाण यामुळे अधिवेशन भरगच्च आणि प्रेरणादायी ठरले.

मनसेचे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांनी महिला पत्रकारांनी संघटित होण्याची गरज व्यक्त केली. एकजूट म्हणजेच शक्ती. या एकतेतूनच पत्रकार महिलांचे हितसंबंध जपले जाऊ शकतात, असे त्यांनी सांगितले.

या अधिवेशनात मिशन महाराष्ट्र या नावाने महिला पत्रकारांचा स्वतंत्र सेल स्थापन करण्यात आला. पत्रकारिता क्षेत्रात महिलांची एक वेगळी ओळख निर्माण करण्याचा उद्देश या सेलमागे आहे. याच वेळी *व्हॉईस ऑफ मिडिया*च्या विशेष स्मरणिकेचे प्रकाशन माधवी ठाकरे यांच्या हस्ते झाले.

रश्मी मारवाडी यांनी अधिवेशनातील १० ठराव वाचून दाखवले, त्यास विना पटणी यांनी अनुमोदन दिले, आणि सर्व महिला पत्रकारांनी त्यास एकमताने संमती दिली. या ठरावांमध्ये महिला पत्रकारांचे हक्क, सुरक्षितता, व्यावसायिक विकास आणि संघटनात्मक भागीदारीसंबंधी महत्त्वाच्या बाबींचा समावेश होता.

या अधिवेशनात संघर्षातून आत्मविश्वास निर्माण होतो, ही भावना प्रत्येक वक्तृत्वातून आणि उपस्थित महिलांच्या अनुभवांतून प्रकर्षाने जाणवली. विविध जिल्ह्यांतून आलेल्या महिला पत्रकारांनी एकमेकींशी संवाद साधत संघर्षांची शिदोरी आणि प्रेरणादायी कहाण्या शेअर केल्या.

कार्यक्रमाच्या समारोपाच्या वेळी उपस्थित सर्व महिलांना व्हॉईस ऑफ मिडियाची शपथ देण्यात आली. पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नव्हे, ती समाज घडवण्याची प्रक्रिया आहे, असा संदेश या अधिवेशनातून ठळकपणे उमटला.

**या अधिवेशनाची ठळक वैशिष्ट्ये:**

- इस्रोच्या वरिष्ठ शास्त्रज्ञ माधवी ठाकरे यांचे मार्गदर्शन
- मिशन महाराष्ट्र महिला पत्रकार सेलची स्थापना
- महिला पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी व विशेष कार्यशाळा
- प्रेरणादायी ठराव संमत व्हॉईस ऑफ मिडियाची स्मरणिकेचे प्रकाशन
- महिलांना सशक्ततेचा आणि सकारात्मक पत्रकारितेचा संदेश

# दाभोळकर हत्या आणि मी पुस्तकाचा प्रकाशन सोहळा संपन्न

■ **महासागर प्रतिनिधी,**
**सातारा, दि. २० :** डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येच्या प्रकरणात १० वर्षे तुरुंगात खितपत पडलेले आरोपी शेवटी निर्दोष ठरतात. त्यांच्या आयुष्याची कोण जबाबदारी घेणार? कोणी यावर प्रश्न का विचारत नाही? असे सवाल स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्यकारी अध्यक्ष रणजित सावरकर यांनी उपस्थित केले. ते दाभोलकर हत्या आणि मी या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात बोलत होते. सातारा येथील सिद्धिविनायक मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात पुस्तकाचे लेखक विक्रम भावे, हिंदू विधीज्ञ परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर, राष्ट्रीय सचिव अधिवक्ता संजीव पुनाळेकर आणि हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड राज्य संघटक सुनील घनवट उपस्थित होते. रणजित सावरकर पुढे म्हणाले की, भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या राजकारण्यांचे खटले चालतात, पण न्यायाधीश किंवा न्यायालयीन संस्थांवर कारवाई करणारी स्वतंत्र



यंत्रणा आजही अस्तित्वात नाही. 'हिंदू आतंकवाद' म्हणून प्रचार केला जातो, पण मुस्लिम आतंकवाद्यांना तसे संबोधण्याची हिंमत कोणी दाखवत नाही. त्यांनी हेही स्पष्ट केले की, डॉ. दाभोलकर यांची अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ फक्त हिंदू धर्माच्या विरोधातच केंद्रित होती.

**मी डगमगलो नाही... विक्रम भावे**

लेखक विक्रम भावे म्हणाले, डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणात सीबीआयने माझ्यावर आणि अधिवक्ता संजीव पुनाळेकर यांच्यावर खोटे आरोप लावून मानसिक छळ केला. ज्या खोट्या पुराव्यांच्या आधारावर आरोपपत्र तयार करण्यात आले, ते पाहता हा खटला केवळ मृत व्यक्तीचे मोठे नाव असल्यामुळेच उभा राहिला. पोलिसांना कोणालाही पकडून शिक्षा द्यावीच लागते, हीच यंत्रणांची मानसिकता झाली आहे. अधिवक्ता संजीव पुनाळेकर म्हणाले, मी हिंदूंच्या बाजूने खटला लढवला म्हणून मला अटक झाली. पण जे वकील नक्षलवादी किंवा जिहादींसाठी खटले लढतात, त्यांना काहीही होत नाही. विक्रम भावे यांनी जर नक्षलवाद्यांसाठी पुस्तक लिहिले असते, तर त्यांना आज नोबेल पुरस्कार मिळाला असता. माझ्या कुटुंबाचे आणि व्यवसायाचे नुकसान होईल, पण मी घाबरणार नाही. या पुस्तकात व्यथा आहे, पण त्याहून अधिक निर्धार आहे. याप्रसंगी अधिवक्ता वीरेंद्र इचलकरंजीकर, सुनील घनवट यांनीही मनागत व्यक्त केले. सोहळ्यानंतर अनेकांनी पुस्तकाचे लेखक विक्रम भावे यांच्याशी आवर्जून संवाद साधत त्यांची विचारपूस केली, त्यांच्यावरील भयानक अत्याचार जाणून घेतले. या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला विविध संघटनांचे प्रतिनिधी तसेच अनेक क्षेत्रातील मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.



# भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांच्या चौकशीबाबत शासनाचे मौन

**मुंबई :** सरकारी अधिकाऱ्याच्या भ्रष्टाचाराबाबत तक्रार मिळाल्यानंतरही शासनाच्या परवानगी शिवाय लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला साधी चौकशीही सुरू करण्यावर बंदी आणणाऱ्या भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील १७-अ कलमामुळे आतापर्यंत ३७४ भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांची चौकशी रखडली.

ही बाब माहिती अधिकारातून उघड झाली आहे. त्याच वेळी प्रत्यक्ष लाच घेताना पकडल्या गेलेल्या ३७३ प्रकरणात आरोपपत्र दाखल करण्यासाठी आवश्यक असलेली मंजुरीही प्रलंबित आहे.

# जि.प.सभापती नलगोपुलवार यांच्या हस्ते कांद्री येथे पाणी टँकरचे लोकार्पण

**महासागर प्रतिनिधी**

**जांब (लोहारा) ,दि.२० :** कांद्री येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्य दि. १४एप्रिल ला महिला व बालकल्याण सभापती भंडारा अनिता नलगोपुलवार यांच्या पंधरा वित्त निधी अंतर्गत पाणी टँकरचा लोकार्पण सोहळा पार पडला. कार्यक्रमात प्रमुख उपस्थितीत महिला व बालकल्याण सभापती अनिता नलगोपुलवार, सरपंच बैजू बनसोड ,ग्राम.प.सदस्य दिनेश बालपांडे, ग्राम.प.सदस्य किरणताई बालपांडे,माजी उपसरपंच परमेश्वर नालगोपुलवार, ग्रामसेवक बावनकुळे, खरेदी विक्री संचालक प्रभाकर बारई,माजी पोलिस पाटील गजभिये,विलास बालपांडे, शिंगाडे गुरुजी, विलास झाडे, संदिप शहारे,व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.



# आज तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांचे एकदिवसीय धरणे आंदोलन

## आर्थिक व सेवा विषयक मागण्यांच्या पुर्ततेसाठी आंदोलन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि. २० :** शासनमान्य आर्थिक व सेवा विषयक मागण्यांच्या पुर्ततेसाठी विदर्भ पटवारी संघ नागपूर जिल्हा शाखा भंडारा व विदर्भ मंडळ अधिकारी संघ नागपूर जिल्हा शाखा भंडारा च्या वतीने आज दि. २१ एप्रिल २०२५ रोजी प्रत्येक तालुका स्तरावर तहसील कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणीक धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे या संदर्भात संघटनेतर्फे एक महिन्याअगोदर भंडारा जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनानुसार जिल्हयातील तलाठी व मंडळ अधिकारी यांची जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात यावी तसेच व तलाठी यांचे सि.आर. त्वरीत उपलब्ध करून देण्यात यावे,. जिल्हयात मोठया प्रमाणात तलाठी व मंडळ अधिकारी यांची पदे रिक्त असुन सदर रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी, आजही अनेक तलाठी कार्यालय हे खाजगी इमारतीमध्ये (भाड्यांचे घर) कार्यरत असुन त्याचे तलाठी यांना त्यांचे कार्यालयीन भाडे देण्यात यावे, तलाठी व मंडळ अधिकारी यांना कालबध्द पध्दतीने पदोन्नती व तलाठी यांना स्थायीत्व प्रमाणपत्र देण्यात यावे, सन २०२१ चे जिल्हा परीषद व पं. स. निवडणूकीचे अतिकालीन भत्ता मिळण्यात यावा, कालबाह्य झालेले प्रिंटर तसेच नविन पदनिर्मीत झालेले तलाठी व मंडळ अधिकारी यांना शासनातर्फे नव्याने लॅपटॉप व स्कॅनर प्रिंटर उपलब्ध करून देण्यात यावे , शासकिय कार्यालयातील विज बिलाचे देयकांची रक्कमेचा तात्काळ भरणा करण्यात यावा व तलाठी व मंडळ अधिकारी यांना विनंती बदलीचा लाभ देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देतांना विदर्भ पटवारी व मंडळ अधिकारी संघ, नागपूर जिल्हा शाखा भंडारा चे पदाधिकारी शेखर ठाकरे, राजेश ठाकरे, जयंत सोनवाने, एन.के.शेंडे/ वसुंधरा शेंडे, शैलेश उपासे, विठ्ठल मुंडे, टि.आर.गिऱ्हेपुंजे, ए.एल.पारधी, गणेश पाटील तसेच मंडळ अधिकारी व तलाठी उपस्थित होते.

# चेकपोस्ट जवळच पकडला तहसीलदाराने वाळूचा ट्रक

## चौकीत राहणारे नीद्रावस्थेत



**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी ,दि. २० :** तालुक्यातील बेटाळा येथे लावण्यात आलेल्या 'चेकपोस्ट' समोरून बेटाळा वाळू घाटातून विनापरवाना वाळू घेऊन जाणारा टिप्पर क्रमांक एम . एच.३१ , एफ बी ९२४५ पकडण्यात आला . चेकपोस्टच्या हाकेच्या अंतरावर अवैध वाळू नेणारा टिप्पर पकडण्यात आला . चेकपोस्ट पार करून टीप्पर समोर गेला तेव्हा चेकपोस्ट मधील कर्मचारी झोपले होते का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. अवैध वाळू घेऊन जाणारा टिप्पर तहसील कार्यालयात जमा करण्यात आला आहे .

मोहाडी तालुक्यातील बेटाळा या वाळू घाटातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू विक्री सुरू असून लाखो ब्रास वाळू विनापरवाना नागपूर , रामटेक , अमरावती व इतर ठिकाणी विकली जात आहे. महसूल व पोलीस विभागाने बेटाळा येथे चेकपोस्ट लावले आहे. या चेकपोस्ट समोरून दररोज अवैध वाळू घेऊन मोठ्या प्रमाणात टीप्पर धावत आहेत. घटनेच्या दिवशी चेकपोस्ट पार करून एक टीप्पर अवैध वाळू घेऊन जात होता, त्याच वेळी तहसीलदार प्राजक्ता बुरांडे ह्या रोहना मार्गे बेटाळा येथे दाखल झाल्या त्यांना सदर टिप्पर जात असल्याचे दिसताच त्यांनी सदर टिप्पर थांबवून त्याची चौकशी केली असता त्या टिप्पर चालकाजवळ रेती वाहून नेण्याचा परवाना (रॉयल्टी) नव्हता . त्याच वेळी पंचनामा करून सदर टिप्पर तहसील कार्यालय मोहाडी येथे जमा करण्यात आला.

**चौकी पास करून टिप्पर गेला कसा ?**

बेटाळा येतील वैनगंगा नदीतून मोठ्या प्रमाणात वाळू डेपोच्या नावावर वाळू उत्खनन सुरू असून विनापरवाना वाळू मोठ्या प्रमाणात विकली जात आहे . हे प्रकरण विधानसभेत उठल्यानंतर रोहा , बेटाळा व दाभा येथे महसूल व पोलीस विभागाची संयुक्त चेक पोस्ट लावण्यात आली . सदर टिप्पर हा बेटाळा घाटातून अवैध वाळू भरून भंडारा कडे चेक पोस्ट पार करून जात असताना तहसीलदाराने पकडला . चौकी पार करून सदर टिप्पर समोर का गेला हा प्रश्न उपस्थित झाला असून पाचशे रुपयाची कमाल तर नाही ना असा प्रश्न उपस्थित झाला असून चौकीवरील कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे .

**'घाटकुरोडा वाळू घाटाची करतात बदनामी'**

सदर टिप्पर निलज (बुज) व बेटाळा येथून विनापरवाना वाळू भरून निघतात . रस्त्यात कोणत्याही अधिकाऱ्यांनी , कर्मचाऱ्यांनी सदर वाहन चेक केले किंवा पकडले असता चालक यांना दिलेल्या शिकवनी प्रमाणे सदर वाहन घाटकुरोडा येथून भरून आनल्याचे सांगतात.

# उन्हाळ्यात लोणच्यालाही महागाईचा फटका

## आंब्याचे भाव वाढले, कच्चा मसालेही महागले



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि.२० :** एकीकडे सिलिंडर आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत, तर दुसरीकडे खाद्यतेलाचे दरही वाढले आहेत. यंदा लोणचेयुक्त आंबे बाजारात ८० ते १०० रुपये किलो दराने विकले जात आहेत. त्यामुळे लोणची बनवणेही महाग झाले आहे. आजकाल लोणची तयार करण्यासाठी गृहिणी करी खरेदी करत आहेत.

यंदा गारपीट आणि सोसाट्याचा वारा यामुळे आंब्याच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. त्यामुळे यंदा कैरीच्या दरात झपाट्याने वाढ झाली आहे. यामुळे लोणचे बनवायचे की नाही, असा प्रश्न गृहिणींसमोर निर्माण झाला आहे. सध्या कैरीचा भाव ८० ते १०० रुपये किलो आहे.

आंब्याचा काढणीचा दर १० ते १५ रुपये प्रतिकिलो आहे. तसेच लोणचे बनवण्यासाठी आवश्यक असलेले कच्चे मसालेही खूप महाग आहेत.

पूर्वी सर्व महिला गावरान आंब्याचे लोणचे घरीच बनवत असत, जे गावात सहज उपलब्ध होते, पण आता हा आंबा मिळत नाही, उलट या आंब्याची जागा इतर जातीच्या आंब्यांनी घेतली आहे. पूर्वीच्या काळाप्रमाणे आजही गृहिणी घरी लोणची बनवतात. पण घरी लोणची बनवणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. शहरे आणि खेड्यांतील निम्म्याहून अधिक

# पटेल महाविद्यालयात काव्य वाचन स्पर्धा संपन्न



**मोहाडी :** नटवरलाल जशभाई पटेल कला व वाणिज्य महाविद्यालय मोहाडी येथील मराठी भाषा अभ्यास मंडळाच्यावतीने काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन काव्य वाचन स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेंद्र पवार हे होते. प्रमुख अतिथी म्हणून जि.प.कनिष्ठ महाविद्यालय आंधळगाव येथील प्रा. सचिन टिंगणे उपस्थित होते.काव्य वाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. मयुरी नागोसे हिने पटकावला, द्वितीय क्रमांक कु.कल्याणी आगाशे, तृतीय क्रमांक प्राची झेलकर ,आदित्य चव्हाण यांनी पटकावला. विजेत्यांना मराठी विभागाच्यावतीने रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. प्रमुख अतिथी सचिन टिंगणे यांनी काव्यातील विविध रसांचे मानवी जीवनातील महत्त्व आपल्या भाषणातून सांगितले.अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. पवार यांनी मातृभाषेतूनच व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असते असे सांगितले. काव्यवाचन स्पर्धेचे परीक्षण डॉ.महेश भैसारे,डॉ. विजया राऊत यांनी केले.कार्यक्रमाचे संचालन प्रा.नरेश आंबिलकर यांनी केले .

प्रास्ताविक डॉ.ज्योती पांडे यांनी केले, आभार डॉ.गणेश वानखेडे यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. प्रमोद वरकडे,प्रा. अनमोल गंधे,प्रा. आभा सिंगनजुडे, कन्हैया गुणेश्वर,अनिल चकोले, अजबलाल दमाहे,अभय साखरे, राहुल हेडाऊ,अभय उज्जैनवार यांनी अथक परिश्रम घेतले.

# वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या स्वावलंबी कल्याणकारी समितीची पूर्व विदर्भाची बैठक संपन्न



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि.२० :** वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या स्वावलंबी कल्याणकारी समितीची पूर्व विदर्भ चे बैठक बुधवार दिनांक १९ मार्च २०२५ रोजी भंडारा जिल्हा मराठी पत्रकार भवन येथे पार पडली . या बैठकीचे अध्यक्ष राज्य संघटनेचे कार्याध्यक्ष श्री सुनील पाटणकर यांचे भंडारा जिल्ह्याचे अध्यक्ष किशोर मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले होते.

यावेळी राज्य संघटनेचे पूर्व विदर्भातील पदाधिकारी दिनेश ऊके , विनोद पन्नासे , मनीष वासनिक, अमोल तितरमारे, राकेश आकरे, राजू गवारे, पंकज कोहळे, संजय थोटे, राजेश वैद्य, संजय बदलकर, विजय निर्वाण, यावेळी पूर्व विदर्भ समितीचे प्रमुख श्री सुनील पाटणकर यांनी समितीचे कामकाजा बाबत व निधी उभारण्याबाबत आपले मत व्यक्त केले. यावेळी सर्व पूर्व विदर्भातील पदाधिकारी यांनी मोलाच्या मार्गदर्शन केले. भंडारा जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटना चे अध्यक्ष यांच्या हस्ते सर्व पाहुण्यांच्या सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन श्री अंगपाल पारधी आभार अरविंद शेंडे यांनी केले. भंडारा येथील वृत्तपत्राचे आऊजा डोंगरे, चंदू लिमजे, पंकेश भोले, ईश्वर धकाते, कंकर अटराये, कुशल कावळे,राजू डोरले,राजू गौरी,प्रफुल्ल देशभ्रतार, योगेश भुरे, नरेंद्र गौरी, रुपेश नंदनवार, चेतन पराते, चंद्रकुमार रेवतकर, हितेश निनावे, मिलिंद बोंगिरवार, प्रभाकर लिमजे, गणेश कुरंजकर, सुरेश चांदेवार, आदींची उपस्थिती होती. तसेच भंडारा जिल्ह्यातून तुमसर, मोहाडी, लाखनी, साकोली, अड्याळ, पवनी येथील वृत्तपत्र विक्रेत्यांची यांची उपस्थिती होती. तसेच भंडारा जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री चेतन भैरम यांनी सदिच्छा भेट दिली.

# 'त्या' ८९ मजुरांना मिळणार तेंदूपत्ता संकलनाचा बोनस

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर,दि. २० :** तेंदूपत्ता संकलन करून वर्ष लोटले असले तरी मजुरांना बोनस मिळाला नसल्याची नागरिकांमध्ये ओरड होती. ''वर्ष लोटले तरी तेंदूपत्ता संकलनाचा बोनस नाही' या मथळ्याखाली अनेक वृत्तपत्रांमध्ये बातम्या प्रकाशित केले होते.

या वृत्ताची दखल घेत वनविभागाने बोनस न मिळालेल्या मजुरांकडून बँक खात्याची झेरॉक्स मागितली असून लवकरच त्यांच्या बँक खात्यात बोनसची रक्कम जमा होणार आहे.

गत वर्षी लाखांदूर तालुक्यात तेंदूपत्ता संकलन करण्यासाठी २ घटक होते.

या घटकांमध्ये ५०, ५१ दिघोरी मोठी, पारडी व ५२, ५३ पिंपळगाव, जैतपूरचा समावेश होता. दिघोरी, पारडी संकलन केंद्रांतर्गत १० तेंदूपत्ता संकलन केंद्र तर पिंपळगाव, जैतपूर संकलन केंद्रांतर्गत १३ संकलन केंद्र होते. दिघोरी, पारडी संकलन केंद्रावर ८२० तर पिंपळगाव, जैतपूर संकलन केंद्रावर १ हजार २६९ मजुरांनी तेंदूपत्ता संकलन केले. एकंदरीत, लाखांदूर तालुक्यात २३

**२घटकांमधून तालुक्यात झाले संकलनाचे काम**

तेंदूपत्ता संकलन केंद्राअंतर्गत हजार ८९ मजुरांनी संकलन केले होते.

मागील वर्षी शासनाकडून तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या मजुरांसाठी बोनस जाहीर करण्यात आला होता. या बोनस अंतर्गत काही मजुरांना बोनसची त्यांच्या रक्कम बँक खात्यात अदा करण्यात आली मात्र काही मजुरांना बोनसची रक्कम अदा करण्यात आली नाही.

एकंदरीतच, लाखांदूर तालुक्यातील २३ तेंदूपत्ता संकलन केंद्राअंतर्गत २ हजार ८९ मजुरांसाठी ६८ लाख ५८ हजार १८ रुपयांचा बोनस निधी मंजूर झाला होता.

त्यापैकी केवळ ८९ मजुरांना बोनस निधी मिळाला नसल्याची माहिती देण्यात आली आहे.

**काहींच्या बँक खात्यामध्ये त्रुटी**

तेंदूपत्ता संकलन करणाऱ्या मजुरांनी सर्वप्रथम बँक खाते क्रमांक दिले होते मात्र ते अस्पष्ट असल्याने व काहींमध्ये चुका झाल्याने बोनसची रक्कम संबंधितांच्या बँक खात्यात जमा झाली नाही. ज्या मजुरांना बोनस मिळाला नाही, त्या मजुरांच्या बँक खात्याची झेरॉक्स मागितली असून त्यांच्या खात्यात बोनसची रक्कम अदा करण्यात येईल. तर काहींचे बँक खाते आंतरजिल्ह्यातील असल्यामुळे या त्रुटी असल्याचे निदर्शनास आले.

**प्रदीप चन्ने, (वनपरिक्षेत्राधिकारी, लाखांदूर)**

# जात प्रमाणपत्र पडताळणी समितीनी दर आठवडयात मंगळवार व गुरुवारला त्रुटी पूर्तता शिबीर

**भंडारा :** १०० दिवसांच्या कृती आराखडया अंतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती विविध कार्यक्रम राबविणार १०० दिवसांच्या कृती आराखडया अंतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती विविध विविध मोहिम राबवूण प्रलंबीत प्रकरणे निकाली काढणार आहे. यात त्रूटी पूर्ततेसाठी प्रलंबीत असलेली प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्यासाठी दर आठवडयात मंगळवार व गुरुवार ला त्रुटी पूर्तता शिबीर सकाळी १०.०० सायंकाळी ५.०० वाजता पर्यंत आयोजीत करण्यात येणार आहे. त्यामुळे अर्जदारांनी त्रुटीची पूर्तता करताच प्रकरण निकाली काढणार असून त्यामध्ये जात प्रमाणपत्र पडताळणी अर्ज कसा भरावा, अर्जा सोबत कोण-कोणती कागदपत्रे जोडावी, याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी वेबीनारचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी विशेष मोहिमेत जास्तीत जास्त विद्यार्थी पालक अर्जदार यांनी सहभागी व्हावे असे आव्हान डॉ. सिध्दार्थ गायकवाड, उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, भंडारा यांनी कळविले आहे.

# वरठी येथे सीसीटीव्ही कॅमेरे लागणार तरी कधी ?

**मोहाडी :** गाव सुरक्षेच्या दृष्टीने शहरात किंवा ग्रामीण भागात वाढत्या चोरीच्या घटनांवर आळा बसावा, कुठेही अनुचित प्रकार घडू नये तसेच अशा घटनांना प्रतिबंध लागावा या उद्देशाने गावात सीसीटीव्ही कॅमेरे लावले जातात. परंतु मोहाडी तालुक्यातील सर्वात मोठ्या वरठी गावात अद्याप पर्यंत सीसीटीव्ही कॅमेरे लागले नसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वरठी हे गाव लोकसंख्या, क्षेत्रफळाच्या दृष्टीने खूप मोठे गाव असून पंधरा हजाराच्या वर लोकसंख्या गावात वास्तव्य करत आहे. १७ सदस्य व १ सरपंच अशी ग्रामपंचायत आहे गावात रेल्वे स्टेशन, पोलीस स्टेशन, सनफ्लॅग कारखाना देखील आहे. जिल्ह्यातील एकमेव रेल्वे स्टेशन असल्या कारणाने या गावाला भंडारा रोड या नावाने सुद्धा ओळखले जाते. गावातून दररोज दहा हजार लोक प्रवास करीत असतात. परंतु एखादा अनुचित प्रकार घडल्यास ते बघण्यासाठी गावात सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. ग्रामपंचायत कार्यालयाला या अगोदर निवेदन दिले आहे , परंतु अजून पर्यंत ग्रामपंचायतीने कसल्याही प्रकारची दखल घेतली नाही. त्यामुळे गावातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर सीसीटीव्ही कॅमेरे लावावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता तारीकराम रामटेके यांनी केली आहे.

# महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती तालुका शाखा भंडाऱ्याची सर्वसाधारण सभा संपन्न





**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि.२० :** दिनांक १९एप्रिल२०२५ रोज शनिवारला महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती तालुका शाखा भंडारा येथील सभा भंडारा जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था जिल्हा भंडारा येथे येथे हरीकिशन अंबादे सर राज्य पदाधिकारी( शिक्षण विस्तार अधिकारी जि. प. भंडारा) यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सभेला जिल्हाध्यक्ष योगेश पुडके , जिल्हा सरचिटणिस रविभाऊ नखाते,जिल्हा शिक्षक नेते डी. डी. दमाहे , शिक्षक पतसंस्था उपाध्यक्ष हरीदास घावळे, दिलीप गभणे मार्गदर्शक,मोहन पडोळे जिल्हा संपर्क प्रमुख, बलवंत भाकरे मार्गदर्शक ,सुनील निनावे जिल्हा मार्गदर्शक , शिक्षक पतसंस्था अध्यक्ष श्री. संजय आजबले , श्रीधर काकीरवार राज्य पदाधिकारी, झाशीराम पटोले सर कार्याध्यक्ष जिल्हा , पतिराम केवट जिल्हा उपाध्यक्ष, सौ. धरती बोरवार महिला जिल्हाध्यक्ष, सौ. माधवी नंदनवार ,अचल दामले कार्यकारी अध्यक्ष , लीलाधर वासनिक जिल्हा कोषाध्यक्ष, विलास दिघोरे जिल्हा पदाधिकारी, दामोधर डहाळे तालुकाध्यक्ष तुमसर, परमेश्वर काळे प्रसिद्धीप्रमुख तुमसर, मोहाडी तालुकाध्यक्ष संजय झंझाड , विकास हटवार सरचिटणीस मोहाडी, अजय बुराडे शिक्षक नेते मोहाडी व जिल्हा पदाधिकारी व इतर तालुक्यातून आलेल्या तालुका कार्यकारिणीचे पदा अधिकारी यांचे प्रमुख उपस्थितीत पार पडली. सभेत शिक्षकांच्या प्रश्नावर चर्चा करण्यात आली. शिक्षकांच्या जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय समस्यांवर एकमेव उपाय म्हणजे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती आहे अशाप्रकारे प्रमुख अतिथींच्या भाषणातून वास्तव परिस्थितीची जाणीव उपस्थित शिक्षक बांधवांना करून देण्यात आली.

पवित्र पोर्टल द्वारा रूजु झालेल्या नविन शिक्षण सेवक बंधु-भगिनींना म.रा.प्रा.शि.समिती द्वारे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले . तसेच आंतर जिल्हा बदलीने तालुक्यात आलेल्या शिक्षक वृंदांचे सुद्धा स्वागत करण्यात आले.

शिक्षकांच्या अनेक समस्यांवर चर्चा करण्यात आल्या.


खालील प्रमाणे तालुका कार्यकारिणीचा खालील प्रमाणे विस्तार करण्यात आला. (तालुका कार्यकारिणीचा उर्वरित विस्तार पुढील सभेला होईल) संपूर्ण कार्यकारणीचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन जिल्हा व राज्य पदाधिकारी यांनी केले. आभार प्रदर्शन श्री. परमेश्वर येनकीकर सर यांनी केले.

**विस्तारित तालुका कार्यकारणी**

**अध्यक्ष - श्री.शुधीर शेन्डे**
**सरचिटणिस - श्री. परमेश्वर येणकीकर**
**कार्यकारी अध्यक्षः - श्री भोजराज भोयर**
**कार्याध्यक्ष - श्री.ज्ञानेश्वर राऊत**
**कोषाध्यक्ष - श्री.शाम सुर्यवंशी**
**शिक्षक नेते - संजय मेश्राम**
**प्रसिद्धीप्रमुख श्री. मंगल मरसकोल्हे**
**तालुका प्रवक्ता श्री. सत्यवान उरकुडे**
**तालुका महिला अध्यक्ष गीता तलमले मॅडम.**
**तालुका महिला प्रमुखः कु.प्रगती तिवाडे मॅडम,**
**तालुका महिला संघटकः लता भोयर मॅडम,**
**तालुका संघटक श्री.मंगेश कपाटे सर,**
**तालुका मार्गदर्शक श्री. वामन गुरवे सर, सुधीर मेश्राम सर,**
**संजय माने सर, प्रशांत घाटोळे सर,**
**जिल्हा प्रतिनिधी श्री. मनोहर पारधी सर,**
**तालुका उपाध्यक्ष श्री. मधुसूदन शेंडे सर,**
**तालुका कार्यालयीन चिटणीस शुद्धोधन गजभिये सर.**

# ईडीची टांगती तलवार...

राष्ट्रनामा



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@gmail.com








डायरेक्टोरेट ऑफ इर्फोसमेन्ट (ईडी)ने मनी लॉँड्रिंगच्या आरोपाखाली सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्यावर न्यायालयात आरोपपत्र दाखल केले आणि देशभर काँग्रेस पक्षाने रस्त्यावर उतरून निदर्शने केली. गेल्या दहा वर्षांत ईडीने देशातील अनेक बड्या बड्या नेत्यांना जेलमध्ये पाठवले, ईडीच्या नोटिशीने अनेक दिग्गजांना घाम फोडला, ईडीचे पथक चौकशीला येताच भल्या भल्यांना कापरे भरले, पण आमच्या पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांवर ईडीने कारवाई केली, हे काँग्रेस कार्यकर्त्यांना मान्य नाही असे दिसते. कायद्यापुढे सर्व समान आहेत असे म्हटले जाते, पण गांधी परिवार हा कायद्यापेक्षा मोठा आहे अशी समजूत काँग्रेस जनांची झालेली दिसते. आपण जर निर्दोष आहोत, आपण कोणतेही आर्थिक गैरव्यवहार केलेले नाहीत, आपण दोन हजार कोटींची नॅशनल हेराल्डची मालमत्ता काबीज करण्याचा प्रयत्न केलेला नाही अशी जर सोनिया व राहुल यांची ठाम भूमिका असेल, तर न्यायालयासमोर जायला त्यांना कशाची भीती वाटते? सोनिया गांधी व त्यांचे पुत्र राहुल हे सध्या जामिनावर आहेत. जर ईडीने दाखल केलेल्या खटल्यात त्यांच्यावरील आरोप सिद्ध झाले नाहीत, तर ते निर्दोष मुक्त होतील व काँग्रेस जनांना त्यांची विजयी मिरवणूक काढण्याची संधी मिळेल, पण न्यायालयात आरोपपत्र दाखल केले म्हणून काँग्रेसने देशभर रास्ता रोको आंदोलन कशासाठी चालवले आहे?

ईडीने विशेष न्यायालयात दि. ९ एप्रिल रोजी आरोपपत्र दाखल केले व दि. २५ एप्रिल रोजी सुनावणी होणार आहे. हरियाणामध्ये तत्कालीन भूपिंदरसिंह हुड्डांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस सरकारने नॅशनल हेराल्ड वृत्तपत्र प्रसिद्ध करणाऱ्या असोसिएटेड जर्नल लिमिटेड (एजेएल) या कंपनीला पंचकुला येथे एक मौल्यवान भूखंडाचे पुर्नवितरण केले होते. भूखंड वाटपात मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला म्हणून ईडीने सहा वर्षांपूर्वी त्या भूखंडावर जप्ती आणली होती. ईडीने केलेल्या तपासात असे आढळून आले की, एजेएलचे ९९ टक्के शेअर्स यंग इंडियन या खासगी कंपनीला हस्तांतरित झाले आहे. अवघ्या पन्नास लाखांत दोन हजार कोटींपेक्षा जास्त मालमत्ता हस्तांतरित झाल्याचे तपासात आढळून आले. यंग इंडियन या कंपनीचे सोनिया गांधी व राहुल गांधी यांच्याकडे प्रत्येकी ३८ टक्के शेअर्स आहेत. म्हणजेच आई व मुलाकडे मिळून या कंपनीचे ७६ टक्के शेअर्स आहेत. उर्वरीत २४ टक्के शेअर्स मोतीला वोरा, ऑस्कर फर्नांडिस व इतरांच्या नावावर आहेत. नफा न मिळवणारी चॅरिटेबल कंपनी म्हणून यंग इंडियनची नोंद आहे. आरोपपत्रात वोरा व फर्नांडिस हे गांधी परिवाराच्या निकटचे असल्याचा उल्लेख आहे. सन २०२२ मध्ये ईडीने सोनिया, राहुल, वोरा व फर्नांडिस यांना आर्थिक व्यवहाराच्या चौकशीसाठी बोलविले होते.

असोसिएटेड जर्नल लि. ची स्थापना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९३७ मध्ये केली. या कंपनीवर वर्षानुवर्षे काँग्रेस व गांधी परिवाराशी संबंधित नेत्यांची पदाधिकारी म्हणून वर्णी लागत असे. वोरा, फर्नांडिस यांच्या व्यतिरिक्त भूपिंदरसिंग हुड्डा यांचे पुत्र दीपेंद्रसिंग, सॅम पित्रोदा, दीपकभाई रतिलाल बबारिया, सुमन दुबे अशी काहींची नावे एजेएल कंपनीवर पदाधिकारी सांगता येतील.

पंचकुला सेक्टर ६ मध्ये हरियाणा पोलीस मुख्यालयासमोरच ३३६० चौरस मीटरचा भूखंड आहे. त्याच्या आजूबाजूला मोठ-मोठी निवासस्थाने, शासकीय इस्पितळ, हरियाणा शहरी विकास प्राधिकरणाचे कार्यालय (हुड्डा), हरियाणा राज्य औद्योगिक विकास महामंडळ, राज्य पणन महामंडळ तसेच वन विभागाचेही कार्यालय आहे. एजेएलला वितरीत केलेला भूखंड अतिशय मौल्यवान होता. बन्सीलाल राज्याचे मुख्यमंत्री असतानाच हा भूखंड एजेएल कंपनीला १९८२ मध्ये देण्यात आला होता. नियमानुसार दिलेल्या ठराविक मुदतीत एजेएलने त्यावर बांधकाम सुरू न केल्याने त्यावरचा हक्क संपुष्टात आला व तो भूखंड परत सरकारकडे गेला. कंपनीने हरियाणा नंतर सरकारकडे बराच प्रयत्न करूनही तो भूखंड परत मिळाला नाही. पुढे हुड्डा हरियाणाचे मुख्यमंत्री झाले व सहा महिन्यांतच हा मौल्यवान भूखंड परत मिळविण्यात एजेएल कंपनीला यश मिळाले. त्यावेळी मोतीलाल वोरा हे असोसिटेड जर्नलचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर होते. कंपनीला अवघ्या ६९ लाख ३९ हजार रुपयांत हा किमती भूखंड मिळाला. २३ वर्षांपूर्वी जो दर लावला होता (५९ लाख ३ हजार) तोच दर पुन्हा आकारण्यात आला, व त्यात व्याजाची रक्कम भर घालण्यात आली. बाजारभावाने याच भूखंडाची किंमत ६४ कोटी ९३ लाख रुपये होती, असे ईडीने म्हटले आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी केवळ दोन महिने अगोदर म्हणजेच १४ ऑगस्ट २०१४ रोजी या भूखंडावर उभारलेल्या चार मजली इमारतीला हरियाणा शहरी विकास प्राधिकरणाने ऑक्युपेशन सर्टिफिकेट दिले. मात्र या भूखंडाची सरकार दरबारी नोंद शासकीय कार्यालय अशीच आहे. हरियाणा विधी विभागाचा नकारात्मक अभिप्राय डावलून तत्कालीन काँग्रेसचे मुख्यमंत्री हुड्डा यांनी स्वेच्छा अधिकारात तो मौल्यवान भूखंड एजेएल कंपनीला द्यावा असा आदेश दिला. पंडित नेहरूंनी स्थापन केलेल्या या कंपनीला नवजीवन हे हिंदी भाषिक दैनिक सुरू करावयाचे आहे व सार्वजनिक हितासाठी संबंधित भूखंड कंपनीला देणे उचित ठरेल असे हुड्डा यांनी १७ ऑगस्ट २००५ रोजी दिलेल्या आदेशात म्हटले होते.

हरियाणात २६ ऑक्टोबर २०१४ रोजी मनोहरलाल खट्टर यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे सरकार स्थापन झाले व पंचकुलामधील मौल्यवान भूखंड पुन्हा एजेएल कंपनीला दिल्याप्रकरणी झालेल्या घोटाळ्याची चौकशी करण्याचे त्यांनी आदेश दिले. जून २०१६ मध्ये ईडीने तत्कालीन मुख्यमंत्री हुड्डा यांच्या विरोधात भूखंड वितरणात सरकारचे मोठे आर्थिक नुकसान झाले म्हणून मनी लॉँड्रिंगचा ठपका ठेवला. भूखंड घोटाळ्याची सखोल चौकशी करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री खट्टर यांनी सीबीआयकडे चौकशी सोपवली. एप्रिल २०१७ मध्ये सीबीआयने हुड्डा व इतरांवर सत्तेचा गैरवापर व आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. हुड्डा यांनी आदेश दिला तेव्हा ते मुख्यमंत्री होते म्हणून एफआयआरमध्ये त्यांचे नाव नाही मात्र हरियाणा विकास प्राधिकरणाचे चेअरमन असा सीबीआयने उल्लेख केलाय. कोविडच्या काळात २१ डिसेंबर २०२० रोजी मोतीलाल वोरा यांचे निधन झाले म्हणून त्यांचे नाव आरोपपत्रातून बाद झाले. पंडित नेहरूंनी स्थापन केलेल्या असोसिएटेड जर्नल लि.च्या वतीने इंग्रजीत नॅशनल हेराल्ड, हिंदीत नवजीवन आणि उर्दूत कौमी आवाज ही वृत्तपत्रे प्रकाशित केली जात असत. या वृत्तपत्रातून स्वातंत्र्याची चळवळ लढवली गेली. १९४७ मध्ये पंडित नेहरू पंतप्रधान झाले व त्यांनी कंपनीच्या संचालक मंडळाचा राजीनामा दिला. पण काँग्रेस पक्षाची या वृत्तपत्रांवर पकड कायम राहिली. १९५६ मध्ये एजेएलची व्यावसायिक कंपनी म्हणून नोंद करण्यात आली. पुढे आर्थिक संकटामुळे २००८ मध्ये सर्व प्रकाशने बंद पडली. २०१६ मध्ये केवळ डिजिटल मीडिया चालू होता. एजेएल कंपनीची मालमत्ता तेव्हा दोन हजार कोटींच्या घरात होती, ती आपल्या ताब्यात घेण्यासाठी सोनिया व राहुल यांनी काँग्रेस पक्षाचे पैसै वापरले असा आरोप सुब्रमण्यम स्वामी यांनी केला व त्याचीच चौकशी ईडीने करून आरोपपत्र दाखल केले आहे.

नॅशनल हेराल्ड बंद झाला तेव्हा कंपनी काँग्रेसला ९० कोटी रुपये देणे लागत होती, २०१० मध्ये काँग्रेस पक्षाने हे कर्ज यंग इंडियन प्रा. लि. कंपनीकडे हस्तांतरित केले. यंग इंडियनचे ७६ टक्के समभाग सोनिया व राहुल यांच्याकडे आहेत. दोन हजार कोटींची मालमत्ता हडप करण्यासाठी खोटे व्यवहार करून पैशाची अफरातफर केल्याचा आरोप केला गेला. मनी लॉँड्रिंगचा गुन्हा नोंदवला. यंग इंडियनने पन्नास लाखांत एजेएलची दोन हजार कोटींची मालमत्ता आपल्याकडे घेण्याचे कारस्थान रचले असा आरोप झाला.

दिल्लीत बहादूर शाह जाफर मार्गावर नॅशनल हेराल्डची इमारत आहे. शिवाय मुंबई, लखनऊ, भोपाळ येथेही कंपनीची मालमत्ता आहे. देशभरातील मोठ्या शहरातील मौल्यवान जागा गांधी परिवाराच्या हाती सोपविण्याचे एक मोठे कारस्थान रचले गेले असा आरोप केला जात आहे. मनी लॉँड्रिंग ॲक्टनुसार ईडीने आरोपपत्र दाखल केले आहे. त्यात सोनिया, राहुल, सॅम पित्रोदा, सुमन दुबे व इतरांची नावे आहेत. मोठी पोल खोल होईल अशी काँग्रेसला भीती वाटते आहे, असे भाजपाने म्हटले आहे.

काँग्रेसने म्हटले आहे की, बारा वर्षांपूर्वीची ही केस आहे. एका पैशाचीही देवाण-घेवाण झालेली नाही. एकही मालमत्ता हस्तांतर झालेले नाही. पण आरोपपत्र दाखल झाल्याने ईडीची तलवार गांधी परिवारावर लटकते आहे.

# बांगलादेशात अल्पसंख्य खतरे में !

बांगलादेश पूजा उद्यापन परिषदेच्या बिरल युनिटचे उपाध्यक्ष भाबेश चंद्र रॉय यांचे अपहरण करून त्यांची हत्या केल्याची घटना गुरुवारी उघडकीस आली. त्यांच्या राहत्या घरातून त्यांचे अपहरण करण्यात आले आणि जवळच्या गावात नेऊन त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. बेशुद्ध अवस्थेत त्यांना घरी सोडण्यात आले. त्यांना रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. ५ ऑगस्टला बांगलादेशात शेख हसीना यांचे सरकार पडल्यानंतर तेथे मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. दंगली झाल्या, प्रचंड प्रमाणात जाळपोळ झाली. शेख हसीना यांनाही देश सोडून भारतात पलायन करावे लागले. या दंगलीमध्ये स्थानिक हिंदूंना जाणीवपूर्वक लक्ष केले जाऊ लागले, हिंदूंना घरात घुसून मारहाण होऊ लागली, त्यांची घरे, दुकाने लुटून ती जाळण्यात येऊ लागली, त्यांच्या जमिनी हडपण्यात आल्या, त्यांना त्यांच्याच घरातून हाकलले जाऊ लागले. हिंदूंच्या मंदिरांवर हल्ले होऊ लागले, देवतांच्या मूर्तींची तोडफोड होऊ लागली, हिंदू स्त्रियांवर, बालकांवर अत्याचार होऊ लागले. ऑगस्ट महिन्यात देशभरात पसरलेले हे हिंदुविरोधी लोण आजही कायम आहे. ढाका येथील मानवाधिकार संघटना ऐन ओ सलीश केंद्रच्या गेल्या मासातील एका अहवालात असे म्हटले होते की, बांगलादेशात हिंदूंची घरे, मंदिरे आणि व्यावसायिक प्रतिष्ठान यांची तोडफोड करण्याच्या एकूण १४७ घटना घडल्या आहेत. या घटनांमध्ये अनुमाने ४०८ घरांची तोडफोड करण्यात आली, ज्यात ३६ जाळपोळीच्या घटनांचा समावेश आहे. याखेरीज अल्पसंख्यांकांच्या मालकीच्या व्यावसायिक प्रतिष्ठानांची तोडफोड करण्याच्या ११३ घटना घडल्या आहेत. मागील आठ महिन्यांपासून बांगलादेशमध्ये अराजकसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून देशातील बहुसंख्यांकांकडून जाणीवपूर्वक अल्पसंख्यकांना लक्ष केले जात आहे. बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराचे पडसाद भारतातही उमटले असून भारतातील हिंदुत्ववादी संघटनांनी बांगलादेशातील या दडपशाहीच्या विरोधात आजतागायत देशभर आंदोलने केली आहेत. भारतातील अल्पसंख्यांकाची तळी उचलण्यास सदैव तत्पर असणारा अल्पसंख्यांक आयोग बांगलादेशातील हिंदूवरील अत्याचाराच्या विरोधात मूग गिळून गप्प का असाही सवाल आज विचारला जात आहे.

१९४७ साली पूर्व पाकिस्तानमध्ये म्हणजे आताच्या बांगलादेशमध्ये एक तृतीयांश हिंदू होते. २०२२ मध्ये जेव्हा देशात जनगणना झाली तेव्हा तेथे ७.९६ टक्के हिंदू शिल्लक राहिल्याची अधिकृत आकडेवारी जाहीर करण्यात आली होती. फाळणीनंतर तेथील हिंदूंची संख्या कमी होत गेली तर मुस्लिमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली. फाळणीपासूनच स्थानिक अल्पसंख्य हिंदूंना लक्ष केले जात आहे, स्थानिकांच्या छळाला कंटाळून दरवर्षी लाखो हिंदू देशातून पलायन करतात. हे प्रमाण गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाढले आहे. बांगलादेशातील हिंदूंना दिली जाणारी अन्याय्य वागणूक हा जुना विषय असला तरी गेल्या सात-आठ महिन्यांत तेथील हिंदूंची स्थिती अत्यंत बिकट झाली आहे, हे असेच चालत राहिले तर पुढील काही महिन्यांतच बांगलादेशात नावालाही हिंदू शिल्लक राहणार नाही. याउपरांत बांगलादेशातील गरिबीला कंटाळून बांगलादेशी मुसलमानांचे लोंढेच्या लोंढे भारतात येत आहेत. आजमितीला ही संख्या १० कोटीहून अधिक झाली आहे भारतातील विकसनशील शहरी भागात बांगलादेशी नागरिकांच्या वस्त्या तयार झाल्या आहेत. येथील स्थानिक झोपडपट्टी दादा पैशांच्या मोबदल्यात या बांगलादेशी घुसखोरांच्या निवाऱ्याची, नोकरी व्यवसायाची आणि कागदपत्रांची व्यवस्था करून देतात. आजमितीला अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये आणि अनधिकृत कामांमध्ये बांगलादेशी घुसखोरांचा सहभाग असल्याचेउघड होत आहे.घुसखोरांना त्यांच्या देशात हाकलण्याचा कायदाही अस्तित्वात आहे; मात्र त्याची कठोरपणे अंमलबजावणीच केली जात नाही. एकीकडे बांगलादेशातील हिंदू नामशेष होऊ लागला आहे तर दुसरीकडे भारतात आलेले बांगलादेशी घुसखोर भारताची अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात आणू लागले आहेत. भारतात अवैधपणे राहणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना हाकलून देण्यासाठी देशभरात विशेष मोहीम राबवण्यात यावी तसेच भारताच्या शेजारील राष्ट्रांत अल्पसंख्य हिंदूवर होत असलेल्या अत्याचाराच्या विरोधात भारताने आंतराष्ट्रीय पातळीवर आवाज उठवावा अशी मागणी सातत्याने करण्यात येत आहे; मात्र दर वेळेस अशा काही घटना घडतात तेव्हा त्या घटनेचा तीव्र निषेध करण्याव्यतिरिक्त सरकारकडून अन्य काही पावले उचलली जात नसल्याचे लक्षात येते. आज जसे बांगलादेशात हिंदूंना लक्ष केले जात आहे तसे ज्यू लोकांना लक्ष करण्याची हिम्मत कोणत्याही देशाची नाही. ज्यू लोकांवर जगभरात कोठेही हल्ले झाले तर इस्त्रायल पेटून उठतो, ज्यू लोकांना संरक्षण देण्यासाठी आक्रमक होतो. भारत अशा प्रकारची भूमिका केव्हा घेणार आहे ?



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

# मराठी शाळाच दर्जेदार

मार्च, एप्रिल महिन्यांमध्ये परीक्षा संपल्या की, विद्यार्थी निर्धास्त होतात कारण पुढील दीड दोन महिने त्यांच्यासाठी सुट्टीचे असतात. पण याच दोन महिन्यात पालकांना वेध लागतात ते आपल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशाचे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पालक म्हणजे ज्यांचे पाल्य पहिलीत दाखल होणार आहेत अशा पालकांमध्ये तर मोठा संभ्रम असतो. आपल्या पाल्यांना मराठी शाळेत दाखल करायचे की इंग्रजी शाळेत दाखल करायचे याबाबत त्या पालकांमध्ये मोठा संभ्रम असतो. मुलांचे शिकण्याचे माध्यम मराठी असावे की इंग्रजी यावर मग कुटुंबात मोठा खल होतो. नातेवाईक, शेजार पाजारी, मित्रमंडळी अशा पालकांना वेगवेगळा सल्ला देत असतात अशा वेळी कोणता निर्णय घ्यावा असा मोठा पेच या पालकांना पडतो. इंग्रजी भाषा ज्ञान भाषा असल्याने इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्याकडे बहुतेकांचा कल असतो आणि खरी फसगत इथेच होते. इंग्रजी येण्यासाठी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घ्यावे असे काही नाही मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही मुल चांगल्या प्रकारे इंग्रजी शिकू शिकू शकते. आज जे उच्चपदावर बसलेले नामवंत व्यक्ती आहेत ते सर्व मराठी माध्यमातूनच आणि सरकारी शाळेतूनच शिकले आहेत. खरे तर आज जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेतून दर्जेदार शिक्षण दिले जाते. आज मराठी माध्यमांच्या शाळा देखील कात टाकत आहेत. मराठी माध्यमांच्या सरकारी शाळेत गुणवान, प्रयोगशील, तंत्रस्नेही शिक्षक आहेत. सर्व शिक्षक डी एड, बी एड, एम एड असे उच्च गुणवत्ता प्राप्त आहेत. हे शिक्षक वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देतात.

मराठी माध्यमांच्या शाळेत ई लर्निंग, क्टिव्हिटी बेस लार्निंग च्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. राज्यातील हजारो शाळा आय एस ओ नामांकन प्राप्त झाल्या आहेत. डिजिटल स्कूल, टॅब स्कूल या संकल्पना या शाळेतही रुजत आहेत. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या शाळेतही आता सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. गुणवत्तेच्या बाबतीतही या मराठी शाळा कोठे कमी नाहीत. ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीच असतात. नुकताच जवाहर नवोदय परीक्षेचा निकाल घोषित झाला. यात जिल्हा परिषद शाळेतीलच सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. याशिवाय मंथन, प्रज्ञाशोध या स्पर्धा परीक्षेतही मराठी शाळांचाच डंका वाजतो.

जिल्हापरिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेत मोफत शिक्षण दिले जाते. मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, मोफत शैक्षणिक साहित्य, शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्त्या मिळतात.

गुणवत्तेसह सह शालेय उपक्रमातही मराठी शाळा आघाडीवर असतात. मराठी शाळेत पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा, सहल, वनभोजन, क्षेत्रभेट, मातृ - पितृ पूजन, आनंदी बाजार, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी, विविध स्पर्धा सर्व महापुरुषांच्या जयंत्या असे विविध उपक्रम राबवले जातात.

आता मराठी माध्यमांच्या सरकारी शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी दाखल होत आहेत. आता तर सर्वच मराठी शाळेत सीबीएएससी चा अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे म्हणजे जे शिक्षण इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळेत मिळते तेच शिक्षण आता मराठी माध्यमांच्या शाळेतही मिळणार आहे तरीही शहरातील पालकांना अजूनही इंग्रजी शाळेचा मोह सुटत नाही.

इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून पालक त्या शाळांच्या नादी लागत आहेत. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी शिक्षणाचा बाजार केला आहे . अगदी के जी च्या प्रवेशासाठीही लाखोंची देणगी घेतली जाते शिवाय इमारत निधी, ट्रस्ट निधी तसेच वर्षभर चालणारे वेगवेगळे कार्यक्रम या माध्यमातून पैसे उकळले जातात. पालकांच्या खिशाला कात्री लावण्यासाठी या शाळा वेगवेगळे फंडे शोधत असतात. जर एखाद्या पालकांनी फी भरण्यास उशीर केला तर विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यापर्यंत मजल या शाळांची जाते. कोरोना काळात फी भरता न आलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप काही इंग्रजी शाळांनी केले आहे. अनेक इंग्रजी शाळा शैक्षणिक साहित्य शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. २००३ मध्ये उच्च न्यायलयाने दिलेल्या निकालात शैक्षणिक साहित्य शाळेकडूनच किंवा ठराविक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही असे म्हटले आहे. सरकारनेही वेळोवेळी तसे आदेश काढले आहेत पण या शाळांना सरकारी आदेशाचा आणि न्यायालयाच्या निकालाचा विसर पडला आहे न्यायालये व सरकारला न जुमानता आपली शैक्षणिक दुकानदारी चालवणाऱ्या या शाळांना चाप लावायचा असेल तर पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेत दाखल करण्याऐवजी मराठी माध्यमांच्या शाळेत दखल करावे



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# राज्यपालांच्या अधिकारांना कालमर्यादेचे बंधन

*राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यातील तणाव नवीन नाही. अलीकडे मात्र , त्यांची तीव्रता वाढते आहे .पाठीमागच्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणांमधील राज्यपालांच्या अधिकारक्षेत्राबाबत सीमारेषा निश्चित करत ऐतिहासिक निकाल दिला . त्याबद्दलचा हा ऊहापोह...*

राज्याचे घटनात्मक प्रमुख असलेल्या राज्यपालांच्या अधिकारक्षेत्राबाबत नेहमीच वाद होतात. १९८०च्या दशकात न्यायालयीन सक्रियतेचा उदय झाला आणि अशी अनेक प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात गेली. एस. आर. बोम्मई आणि इतर प्रकरणांतील निकालांतून सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांच्या आधिकारक्षेत्रातील काही बाबी अधिक स्पष्ट केल्या. अलीकडेच राज्यपालांचे अधिकार काय आहेत तसेच विधिमंडळाने मान्य केलेली विधेयक राज्यपालांकडे मान्यतेसाठी गेल्यानंतर त्यांनी काय करावे, याबद्दलच्या प्रकरणांत सर्वोच्च न्यायालयाने ऐतिहासिक निकाल दिला आहे.

प्रजासत्ताक भारताच्या इतिहासात कधी घडलं नाही अशी घटना गेल्या आठवड्यात घडली. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या जोरावर तामिळनाडू सरकारनं राज्यपालांच्या मंजुरीशिवाय विधानसभेनं मंजूर केलेले १० कायद्यांची अधिसूचना जारी केली. राज्यांच्या विधानसभांमध्ये मंजूर झालेली विधेयके राज्यपाल रोखून ठेवू शकत नाहीत, असा महत्त्वपूर्ण निवाडा सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे राज्यपाल या घटनात्मक पदाचा अधिकार आणि जबाबदारीही स्पष्ट झाली आहे. तमिळनाडूत राज्यपाल विरुद्ध राज्य सरकार यांच्यातील जो संघर्ष गेले काही दिवस सुरू होता ,त्या संघर्षाच्या निमित्ताने सर्वोच्च न्यायालयाने दिलेला हा निर्णय निश्चितच महत्त्वाचा आहे. विधिमंडळ अधिवेशनाच्या निमित्ताने जी विविध प्रकारची विधेयके विधानसभेमध्ये संमत होतात आणि राज्यपालांकडे मंजुरीसाठी पाठवली जातात तेव्हा त्यांना मंजुरी देणे इतकेच काम राज्यपालांना करायचे असते. पण तमिळनाडूचे राज्यपाल एन. रवी यांनी तमिळनाडूच्या सरकारने पाठवलेली १० विधेयके विनाकारणच रोखून धरल्याने हा संघर्ष सर्वोच्च न्यायालयात गेला होता.यावर निकाल देताना न्या. पारदीवाला म्हणाले, राज्यपाल हा एक बुद्धिमान संवैधानिक प्रमुख असेल, अशी संविधान निर्मात्यांनी कल्पना केली होती. पण, या प्रकरणात जे उघडकीस आले ते त्यांच्या कल्पनेच्या विरुद्ध होते.राज्यपालांकडे पूर्ण व्हेटो किंवा पॉकेट व्हेटो नाही. त्यांना राज्य मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार काम करावे लागेल. हे विधेयक अनिश्चित काळासाठी थांबवता येणार नाही. राज्यपालांनी कायदेमंडळाच्या कामकाजात हस्तक्षेप करू नये. राज्यपालांची विधेयकांवरील कृती किंवा निष्क्रियता न्यायालयीन पुनरावलोकनाखाली येऊ शकते. विधेयकांवर निर्णय घेताना वेळेची मर्यादा पाळली गेली नाही तर न्यायालय त्याचा न्यायालयीन आढावा घेऊ शकते. जनतेने निवडून दिलेल्या विधानसभेच्या इच्छेविरुद्ध काम करणे हे राज्यपालांच्या संवैधानिक शपथेचे उल्लंघन ठरेल. यानिकालादवारे सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांच्या अधिकारांच्या सीमाही निश्चित केल्या आहेत.

केवळ तमिळनाडूच नाही तर राजकीय बांधिलकी समोर ठेवून काम करणाऱ्या सर्वच राज्यपालांसाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण आणि मार्गदर्शक ठरणार आहे. राज्य सरकार आणि मंत्रिमंडळ समिती यांच्या सल्ल्याने राज्यपालांनी काम करणे अपेक्षित असते. साहजिकच जेव्हा एखादा निर्णय राज्य सरकार मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात येतो.तेव्हा , त्या निर्णयाला हिरवा कंदील देणे एवढेच राज्यपालांच्या हातात असते.राज्यपाल संविधानाची शपथ घेत असल्यामुळे त्यांना कोणत्याही विशिष्ट राजकीय पक्षाचे काम करता येत नाही, अशा स्पष्ट शब्दांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांचे अधिकार अधोरेखित केल्यामुळे राजकीय हेतूने नियुक्त झालेले राज्यपालही आगामी कालावधीमध्ये आपल्या सीमा ओळखून काम करतील अशी आशा करायला हरकत नाही.

अर्थात, तमिळनाडूमधील राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यातील संघर्षाच्या निमित्ताने हा विषय समोर आला असला तरी बहुतेक राज्यांमध्ये असाच विषय आहे. जेव्हा केंद्रात एखाद्या पक्षाचे सरकार असते आणि राज्यात एखाद्या दुसऱ्या पक्षाचे सरकार असते तेव्हा जाणीवपूर्वक तेथील राज्य सरकारला त्रास देण्यासाठी केंद्रातील सरकार आपल्या विचाराच्या किंवा पक्षाचे धोरण मानणाऱ्या व्यक्तीची राज्यपालपदी नियुक्ती करते. गेल्या काही वर्षांत एखाद्या राजकीय पक्षांमध्ये दीर्घकाळ सक्रिय असलेल्या नेत्याचीच राजकीय सोय म्हणून राज्यपालपदी नियुक्ती केली जात असल्याने राज्यपाल पदावर बसल्यावरही ती व्यक्ती आपल्या पक्षाची धोरणे विसरत नाही. त्याच्यातूनच या प्रकारचा गोंधळ निर्माण होतो.पूर्वीपासुन एखाद्या राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यासाठी राज्यपाल या पदाचा वापर केला जात असे.अलीकडच्या काही वर्षोत राष्ट्रपती राजवटीचे हत्यार उपसण्याचे प्रकार काही प्रमाणात कमी झाले असले तरी सत्तेवर असलेल्या राज्य सरकारच्या कारभारात अडथळा निर्माण करण्यासाठी राज्यपाल या पदाचा वापर सुरू झाला हे सुद्धा उघड सत्य समोर आहे.

राज्यपालांनी पद स्वीकारल्यानंतर या घटनात्मक पदाचा मान राखून राजकारणमुक्त पद्धतीने काम करणे अपेक्षित असते. आता तमिळनाडूतील संघर्षाच्या निमित्ताने का होईना सर्वोच्च न्यायालयानेच राज्यपालांच्या अधिकारांच्या सीमारेषा निश्चित केल्या असल्याने यापुढील कालावधीमध्ये राज्य सरकार आणि राज्यपाल यांच्यातील संघर्षाच्या नवनवीन कहाण्या निर्माण होणार नाहीत, अशी आशा ठेवायला हरकत नाही.

राज्यपालांकडे घटनादत्त अधिकार आहेत त्यांचा उपयोग राज्यपालांनी अवश्य केला पाहिजे. तथापि ,त्याचा अर्थ केवळ आपल्याला राज्यपालपदी नेमणाऱ्या केंद्रातील सत्ताधारी पक्षापेक्षा निराळ्या पक्षाचे सरकार राज्यात सत्तेत असल्याने त्याच्या कारभारात पदोपदी हस्तक्षेप करणे असा होत नाही.या कुरघोड्यांच्या राजकारणात चढाईने किंवा राज्य सरकारला कात्रीत पकडण्याची ताकद आपल्याकडे आहे या जाणीवेने तात्पुरते समाधान कदाचित मिळेलही; पण त्याचे परिणाम दीर्घकालीन हिताचे असणार नाहीत याचे विस्मरण होता कामा नये. लोकशाहीत शासनव्यवस्थेत सत्ताधारी बदलत राहतात .पण, त्यांनी घालून दिलेले पायंडे आणि प्रघात यांच्या पगड्यातून सुटका करून घेणे सोपे नसते. तेव्हा तात्पुरत्या वर्चस्वासाठी चुकीचे पायंडे पाडण्यात अर्थ नाही.

तामिळनाडू राज्यातील हे प्रकरण २०० व्या कलमाशी संबंधित आहे. या कलमानुसार, एखादे विधेयक संमत झाल्यानंतर ते राज्यपालांकडे पाठवण्यात आले तर त्याबाबत राज्यपालांकडे तीन पर्याय असतात. एक म्हणजे त्याला संमती देणे. दुसरा पर्याय म्हणजे नकार देणे किंवा तिसरा पर्याय म्हणजे राष्ट्रपतींच्या संमतीसाठी ते राखून ठेवू शकतात. यातील नकार देण्याचा दुसरा पर्याय हा संसदीय लोकशाहीमध्ये कधीच नष्ट झालेला आहे. इंग्लंडमध्ये गेल्या १५० वर्षांमध्ये एकदाही कधी असे झाले नाही की, पंतप्रधानांनी दिलेल्या सल्ल्याला राजाने नकार दिला राष्ट्रपतीबाबतही तसेच आहे. संसदेने मंजूर केलेले विधेयक जर त्यांना पटले नाही तर एकदा ते मंत्रिमंडळाकडे पाठवू शकतात, पण पुन्हा मंत्रिमंडळाने तोच सल्ला दिला तर तो राष्ट्रपतींना पाळावा लागतो ,राज्यपालांबाबतही हाच नियम लागू आहे. त्यांना विधिमंडळाचे एखादे विधेयक योग्य वाटले नाही तर ते विधिमंडळाकडे पाठवतात. तिथे हे विधेयक पुन्हा संमत करण्यात आले तर मात्र राज्यपालांनाही त्या विधेयकाला संमती द्यावीच लागते. पुनर्विचार होऊन आलेले विधेयक राष्ट्रपतीकडे पाठवता येत नाही. केवळ पहिल्यांदाच आलेले विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवता येते. या सर्वांमध्ये कळीचा आणि वादाचा मुद्दा होता तो कालमर्यादेचा म्हणजेच विधिमंडळाने पाठवलेल्या विधेयकाबाबत राज्यपालांनी किती दिवसांत निर्णय घ्यायचा याला आजवर मुदतीची चौकटच नव्हती.

राज्यपालांनी एकदा परत पाठवलेले विधेयक राज्य सरकारने दुसऱ्यांदा मंजूर करून राज्यपालांकडे पाठवले असेल, तर राज्यपाल ते पुन्हा राष्ट्रपतींच्या विचारार्थ पाठवून अडवू शकत नाहीत. दुसऱ्यांदा आलेल्या विधेयकास राज्यपालांनी एक महिन्याच्या आत मंजुरी देणे आवश्यक आहे. न्यायालयाने ठरवून दिलेल्या कालमर्यादेचे पालन न केल्यास राज्यपाल न्यायालयीन समीक्षेच्या कक्षेत येतील. अशी सीमारेषा न्या. पारडीवाला आणि न्या. आर महादेवन यांनी ती आखून दिली आहे .

महाराष्ट्रामध्ये भगतसिंह कोश्यारी यांनीही मंत्रिमंडळाने आणि कायदेमंडळाने संमत केलेल्या विधेयकांवर कसलीही कार्यवाही न करण्याची भूमिका घेतली होती. विधान परिषदेचे १२ सदस्य नेमण्याची यादी त्यांच्याकडे पाठवण्यात आली तेव्हा दोन वर्षे त्यांनी त्याबाबत काहीही ॲक्शन घेतली नाही. दिल्लीचे नायब राज्यपाल यांबाबत घटनात्मकवाद समोर आले आहेत.या निर्णयाचा विचार करता जोपर्यंत संसद यासंदर्भात कोणताही कायदा करून त्यामध्ये बदल करणार नाही तोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने दिलेला निर्णय हा कायदा म्हणून अमलात आणला जाईल. त्यामुळे हे प्रकरण तामीळनाडूपुरते मर्यादित नाही देशातील २८ राज्यांमध्ये तो बंधनकारक राहील ,सुरुवातीला म्हटल्यानुसार हा निर्णय स्वातंत्र्यानंतरच्या अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या निर्णयांपैकी एक आहे.

भारताने संसदीय लोकशाही शासनव्यवस्थेचे प्रारूप हे इंग्लंडकडून स्वीकारले आहे. त्यानुसार आपण कायदेही केले, परंतु संसदीय लोकशाहीमध्ये प्रथा आणि परंपरांना खूप महत्त्व आहे. आपल्याकडे त्या पाळल्या जात नाहीत. उदाहरणार्थ, राज्यपालांनी सरकार स्थापनेसाठी कोणाला आमंत्रित करायचे, याबाबत अनेकदा सर्वात मोठा पक्ष असतो ,त्यांना निमंत्रण दिले जाते. काही वेळा आघाडी करून बहुमताचा आकडा असल्याचा दावा केला जात असेल त्यांना बोलावले जाते. अशा प्रकारची रचना बदलली गेली पाहिजे. यासंदर्भात प्रथा-परंपरा पडणे आवश्यक आहे. त्या जितक्या लवकर पडतील तितके आपल्या लोकशाहीसाठी ते चांगले असेल.

राज्यातील सरकार कोणत्याही पक्षाचे असो; राज्यपाल आणि राज्य सरकार यांच्यात समन्वय आणि संवाद असावयास हवा ही अपेक्षा अवाजवी नाही. पण तीच आता फोल ठरत चालली आहे.

जर केंद्र सरकारला असे वाटले की, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्या अधिकारांमध्ये हस्तक्षेप झाला आहे, तर केंद्र सरकार सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करू शकते, किंवा या प्रकरणाची ५, ७ किंवा ९ न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर सुनावणी करण्याची मागणी करू शकते. अशा कठोर निर्देशाची गरज का भासली, याचा विचार होणे आवश्यक आहे. गेल्या काही वर्षोपासून विरोधी पक्षाची सत्ता असलेल्या राज्यांच्या विधानमंडळाने मंजूर केलेली विधेयके राज्यपाल मंजूर करीत नव्हते आणि ती प्रलंबित ठेवीत होते. जर विधानमंडळाने जी विधेयके विचारार्थ राष्ट्रपतींकडे पाठविण्याच्या नावाखाली त्यांच्या मंजुरीत अडथळा आणला जात होता. या सर्व प्रकारांमध्ये केंद्र सरकारने ही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. लोकशाही शासन व्यवस्था सुरक्षित चालविण्यासाठी परस्पर सहकार्य , संवाद आवश्यक असतो. राज्यपालांमार्फत विरोधी पक्षाची सरकारे असलेल्या राज्यांमध्ये निर्माण केला जात असलेला हा गतिरोध लक्षात घेता, सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय ऐतिहासिक आहे.

सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्या आधिकारांमध्ये हस्तक्षेप केल्याने केंद्रसरकार पुर्नेविचार याचिका दाखल करु शकते. सर्वोच्च न्यायालय यावर काय निर्णय देते हे येणाऱ्या काही महिन्यातच स्पष्ट होईल.

**ॲड. दत्तात्रय दिनकर फडतरे**
**मोबाईल नं . ७५८८०७२६८५**
लेखक जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे येथून प्रॅक्टीस करत आहे.

## अशोकायन...

**अंदरकी बात ..!**

**झोळी आमची फाटकी**
**करावे तरी काय ?**
**पावसाळ्याच्या दिवसात**
**सारे पाणी वाहून जाय .. !**
**टँकरने पाणी पुरवठा**
**दरवर्षी आम्ही करू**
**कायमस्वरूपी केला साठा**
**तर खिसे केंव्हा भरू ? .**
**पाणी अडवा पाणी जिरवा**
**आता आम्हा आठवते**
**पण तहान लागल्यावर**
**विहीर खोदणे कुठे परवडते . .**



प्रा. अशोक सारडा, मेहकर.
(९४२२३९४३३९)

# राज्यस्तरावर मोहाडी आयटीआयची कबड्डी चमू विजयी

**मोहाडी :** नाशिक येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत नागपूर विभागातील मोहाडीच्या आय.टी.आय. महिला कबड्डी संघ विजयी झाला.

नाशिक येथे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. नागपूर विभागातील कबड्डीचा महिला संघ यांनी मुंबई संघाला पराजित करून प्रथम क्रमांक पटकावले. राज्याचे कौशल्य रोजगार उद्योजक मंत्री मंगल प्रभात लोढा , जलसंपदा मंत्री गिरीश महाजन , व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणच्या संचालक माधवी सरदेशमुख यांच्या हस्ते ट्रॉफी प्रदान करण्यात आली. विजय संघाची कप्तान निकिता डोबनुके, सेजल सार्वे, काजल बाबरे, पायल कस्तुरे, साक्षी तुमसरे, पूजा चारमोडे, दामिनी अजबले,सेजल लेंडे व व्यवस्थापक विकास ठवकर, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोहाडीचे प्राचार्य पी. एस भोयर , किरण सुखदेवे, जयसिंग मोहरे, सुधाकर गावंडे, किरपाल यांनी विजय संघाचे कौतुक केले. नाशिकहून मोहाडी येथे आलेल्या विजय संघाच्या कप्तान निकिता डोबनके व त्यांच्या सहकारी खेळाडूंचे गुलाल उधळून व ढोल ताशा बडवून स्वागत करण्यात आले. नागपूर विभागाचे सहसंचालक के.एम.मोटघरे, सहसंचालक आवारे साहेब, सहसंचालक कुलकर्णी , व्ही. एम.लाकडे , उपसंचालक चव्हाळे , डी. पुंड ,कावाडकर स , किशोरी पंडिले , आर. साळवे , सुधाकर धोटे, डी. डी. गायधने न रजनीश मलेवार,शुभम वानखेडे व नागपूर विभागचे सर्व आय. टी. आय. च्या कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# समाजहिताचा संदेश देणारा सोहळा- नाना पटोले

## व्यसनमुक्ती अभियान अंतर्गत सामूहिक विवाह सोहळा संपन्न



**महासागर प्रतिनिधी**
**साकोली ,दि.२० :** आनंदधाम रामटेक शाखा, परसोडी /सौ. यांच्या वतीने महान त्यागी बाबा जुमदेवजी यांच्या १०४ व्या जयंती उत्सव पर्वाचे औचित्य साधून व्यसनमुक्ती अभियान अंतर्गत भव्य सामूहिक विवाह सोहळा साकोली येथील संताजी तेली सभागृहात आज दि. २० एप्रिल २०२५ला आयोजित करण्यात आला.

या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून मा आमदार नानाभाऊ पटोले उपस्थित होते.

या सोहळ्याद्वारे अनेक जोडप्यांनी विवाहबंधनात प्रवेश करत आपले नवजीवन सुरू केले. सामाजिक सलोखा, एकात्मता आणि समाजहिताचा संदेश देणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.

नवीन जोडप्यांना शुभाशीर्वाद देऊन नवजीवन साठी शुभेच्छा दिल्या.

# पूर्व विदर्भात जलसंपत्ती संवर्धनाची नवी दिशा- माजी मंत्री डॉ. परिणय फुके यांच्या पुढाकाराने तलाव पुनरुज्जीवनासाठी विशेष कार्यशाळा

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा ,दि.२० :** भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील पारंपरिक जलस्रोत असलेल्या माजी मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी माजी मंत्री आणि आमदार डॉ. परिणय फुके यांच्या पुढाकाराने विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा २५ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ वाजता भंडारा जिल्हा नियोजन सभागृहात होणार आहे.

या कार्यशाळेत तालुका स्तरावरील सर्व संबंधित गावांचे प्रतिनिधी, सरपंच व ग्रामसेवक सहभागी होणार असून, आपल्या गावातील तलावांची सविस्तर माहिती घेऊन उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. फुके यांनी केले आहे.



पूर्व विदर्भातील कोरडवाहू भाग जलसमृद्ध करण्यासाठी डॉ. फुके यांनी जलसंधारणाच्या विविध योजनांसाठी सातत्याने पाठपुरावा केला.

त्यांच्या प्रयत्नांमुळे 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' अभियानाला गती मिळाली असून, तलावांचे खोलीकरण व पुनरुज्जीवनाचे काम आता अधिक नियोजनबद्ध रितीने होणार आहे.

सध्या गोंड राजांच्या काळात बांधले गेलेले ६,७०० हून अधिक माजी मालगुजारी तलाव गाळाने भरलेले आहेत. त्यामुळे सिंचन क्षमता कमी झाली असून भूजल पातळीही घटली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत तलाव खोलीकरणाच्या कामातून बाहेर काढण्यात येणाऱ्या गाळावर कोणतेही स्वामित्वधन (रॉयल्टी) आकारले जाणार नाही, असे स्पष्ट केले आहे. या उपक्रमाला टाटा मोटर्स, नाम फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांचे सहकार्य लाभले आहे. तलावातील गाळाचा वापर शेती सुधारणा, सार्वजनिक जागांचे समतलीकरण, शाळा व अंगणवाड्यांच्या परिसरात माती भराव यासाठी केला जाणार आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांनाही या उपक्रमाचा थेट फायदा होणार आहे.

तलाव पुनरुज्जीवनामुळे पाणीसाठवण क्षमता वाढेल, भूजल स्तर सुधारेल, विहिरी व नळपाणी योजना कार्यक्षम होतील, शेतकऱ्यांना सिंचनासाठी भरपूर पाणी मिळेल, मासेमारी व्यवसायास चालना मिळेल आणि संभाव्य पूरस्थितीवरही नियंत्रण ठेवता येईल. माजी मंत्री डॉ. परिणय फुके यांच्या पुढाकारामुळे पूर्व विदर्भातील जलसंपत्ती संवर्धनाचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे .

असा अध्याय जो पाणीटंचाई दूर करत निसर्ग, शेती आणि संपूर्ण ग्रामीण जीवनशैलीला नवसंजीवनी देणार आहे.

# अकॅडमिक हाईटस पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांचे सुयश

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली ,दि.२० :** अकॅडमिक हाईटस पब्लिक स्कुल (एकोडी रोड) साकोली येथील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिम्पियड परिक्षेत घवघवीत यश




२०२४-२५ आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिम्पियड परीक्षेमध्ये सदर शाळेतील विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले.हिंदी विषयात शाळा रॅंकींग मध्ये इऱ्यत्ता१ली मधुन कु.रित अग्रवाल सानिध्य राऊत ह्यांना सुवर्ण पदक, अंशुल गहाणे,क्रिष्णवी फाये, सोफिया शेख,चैताली तरोने,निधी गोंधळे, निधी समरित,तुर्वी मेंढे, अथर्व सोनवाने ह्यांना रौप्य पदक कुशाग्र सहारे आर्थ मानकर,श्रुती कापगते, आरूष मडामे,ड्रिंकल सहारे,पार्थ लांजेवार ह्यांनी कांस्य पदक प्राप्त केले.

इऱ्यत्ता २री मधुन अयान कटकवार, प्रग्यान गुप्ता,पुरब कापगते ह्यांनी रौप्य पदक तर उमंग नारनवरे,आयुष हातझाडे,कु.रुही जगिया,लोचन कापगते,सुशांत टेकाम ह्यांनी कांस्य पदक प्राप्त केले.इऱ्यत्ता ३री मधुन कु.आहाना राऊत हिला सुवर्ण पदक कु.गुजंन मेंढे हिला रौप्य पदक इऱ्यत्ता ४थी मधुन कु.वृत्ती अग्रवाल हिला सुवर्ण पदक,वंश सोनवाणे ह्याने रौप्य पदक तर इऱ्यत्ता ५वी मधुन कु.समृध्दी अग्रवाल हिला सुवर्ण पदक डारवीन करंजेकर ह्याने रौप्य पदक इऱ्यत्ता ६ वी मधुन आयुश मुगुंलमारे ह्याला रौप्य पदक,आदीत्य चंदेल ह्याला कांस्य पदक इऱ्यत्ता ८वी मधुन गायत्री वलथरे हिला सुवर्ण पदक प्राप्त झाले.इऱ्यत्ता ९ वी मधुन कु.गितिका चांदेवार हिला सुवर्ण पदक कु.शरयु गायधने हिला रौप्य पदक प्राप्त झाले. इऱ्यत्ता १० वी मधुन कु.तनिशा निखारे हिला रौप्य पदक प्राप्त झाले.त्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळा व्यवस्थापक जी. एच. ठाकरे, प्राचार्या डॉ.संचिता ब्रम्हचारी, प्रा.अमितोज कौर,प्रा.अतुल नंदेश्वर आईवडील आणि हिंदी विषयाचे शिक्षक पुष्पलता आसलवार नंदा कापगते श्रृणाली जंवजाळ,लता कटरे आणि सर्व शिक्षकवृंद,ह्यांना दिले. सर्व शिक्षकांनी त्यांचे कौतुक करुन अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# भाजपा साकोली शहर अध्यक्षपदी व्यंकटेश येवले यांची निवड

**महासागर प्रतिनिधी**
**साकोली ,दि. २० :** भारतीय जनता पार्टी साकोली शहर मंडळाच्या अध्यक्षपदी व्यंकटेश येवले यांची निवड करण्यात आली.

व्यंकटेश येवले यांनी भारतीय जनता पक्षाच्या विविध पदांवर कामे केलेली आहेत.



यामध्ये साकोली शहर महामंत्री, साकोली शहर सोशल मीडिया प्रमुख, तालुका सोशल मीडिया प्रमुख, सध्या साकोली विधानसभा सोशल मीडिया प्रमुख व भंडारा जिल्हा सहसंयोजक सोशल मीडिया व शक्ति केंद्र प्रमुख साकोली या पदावर कार्यरत असुन ते सोनार समाजाचे मागील पाच वर्षांपासून अध्यक्ष म्हणुन काम सांभाळत आहेत. त्यांनी ह्या नियुक्तीचे श्रेय प्रदेश कार्यकारिणी भाजपा, माजी राज्यमंत्री व विधानपरिषद आमदार परिणयजी फुके, जिल्हाध्यक्ष प्रकाश बाळबुध्दे, माजी तालुकाध्यक्ष भोजराम कापगते व अमोल हलमारे, माजी शहराध्यक्ष नितीन खेडीकर, भाजपा जिल्हा सचिव किशोर पोगडे तसेच भारतीय जनता पक्षातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांना दिले आहे.

या निवडीबद्दल कार्यकर्त्यांमध्ये उत्साह असून त्यांच्यावर शुभेच्छांच्या वर्षाव होत आहे.

# सत्यसाई बाबांच्या १०० व्या जन्मदिन शताब्दी वर्षानिमित्त रक्तदान शिबिर यशस्वी

**भंडारा येथे १० रक्तदात्यांनी केले रक्तदान**

**भंडारा :** उन्हाळ्याच्या दिवसात जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्त संक्रमण विभागात रक्तगटाचा तुटवडा भासत असतो. तो अनुशेष भरून काढण्यासाठी श्री सत्यसाई सेवा संघटना भंडाराच्या वतीने भगवान श्री सत्यसाई बाबांच्या १०० व्या जन्मदिन शताब्दी वर्षा निमित्त भव्य रक्तदान शिबिर श्री गणेश हायस्कूल भंडारा येथे रविवार दिनांक २० एप्रिल २०२५ ला नुकताच घेण्यात आला. त्यावेळी श्री सत्यसाई सेवा संघटना जिल्हा भंडाराचे जिल्हाध्यक्ष धनराज माहुले, समिती प्रमुख रविंद्र नागपुरे,



रविशंकर साकुरे, जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्तपेढी येथील डॉ. श्रृतीका मडावी, सामाजिक कार्यकर्ते विलास केजरकर, ताराबाई ठोंबरे, पर्यावरण प्रेमी राहुल मेश्राम इत्यादी मान्यवर उपस्थित होते. त्याप्रसंगी जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्तपेढी येथील डॉ. श्रृतीका मडावी, टेक्निशियन आकाश महाजन, सना शेख, राहुल गिरी, अश्विन नेवारे, हनमंत गुट्टे इत्यादींनी आपली भूमिका पार पाडली. त्यावेळी अनुराग निंबार्ते, फिरोज मन्नान शेख, स्मित बनकर, किशोर हटवार, मोहित पाठेकर, धनराज माहुले, तुषार पाठेकर, नंदू हटवार, सुनिल मदारकर, महेश जोशी या रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता यशवंत टिचकुले, प्राची देशपांडे, ताराबाई ठोंबरे, प्रकाश चाचेरे, चिन्मय श्रीराम रावते, श्यामराव ठोंबरे, विजय हटवार, प्रकाश लांजेवार, अनिल ठोंबरे, शिवांश नागपुरे, वैभव सुर्यवंशी व श्री सत्यसाई सेवा समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

# उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री निलेश सागर यांची भंडारा भेट

**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा ,दि.२० :** उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री निलेश सागर दिनांक १७ व १८ एप्रिल दरम्यान भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते.

भेटी दरम्यान त्यांनी जिल्ह्यात उमेद अभियानाच्या कामाचा आढावा घेतला.

जिल्ह्यात स्मार्ट योजने अंतर्गत मंजूर प्रकल्प व sub cluster अंतर्गत फिश फीड मिल चे भूमिपूजन तसेच उत्पादक गटांचे शेळीपालन प्रकल्पांचे उदघाटन त्यांच्या हस्ते संपन्न झाले . प्रसंगी त्यांनी CMTC , UMED Mart , मशरूम युनिट, टसर हंड्रूम युनिट, आदर्श प्रभागसंघ, मत्स्य तलाव, शेळीपालन युनिट, १० K FPO input centre , CHC प्रकल्पांना भेट दिली. भेटी दरम्यान त्यांनी जिल्हाधिकारी महोदय यांना अभियाना बद्दल अवगत केले व उमेद टीम ला मोलाचे मार्गदर्शन केले व पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या.



प्रसंगी प्रकल्प संचालक श्री विवेक बोन्द्रे सर उपस्थित होते.

# भंडारा येथे सर्व जातीय सामूहिक विवाह सोहळ्यात १६ जोडपी विवाह बद्ध

*बावणे कुणबी समाज सेवा मंडळ भंडाराचा उपक्रम *१५ वर -वधू हिंदू पद्धतीने तर एक बौध्द धर्म पद्धतीने विवाहबद्ध *खासदार ,आमदार, माजी मंत्री आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांसह हजारोंची उपस्थिती






**महासागर प्रतिनिधी**
**भंडारा ,दि.२० :** बावने कुणबी समाज सेवा मंडळाच्या वतीने सर्व जातीय विवाह सोहळ्याचे आयोजन दिनांक १८ एप्रिलला लाल बहादूर शास्त्री विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले.

प्रथमच महापुरुषांच्या साक्षीने विवाह सोहळा संपन्न.या विवाह सोहळ्यात १५ वर -वधू हिंदू पद्धतीने तर एक वर वधू बौध्द धर्म पद्धतीने विवाह बद्ध झाले .या विवाह सोहळ्याला आजी माजी राज्यमंत्री ,खासदार आमदार व विविध क्षेत्रातील मान्यवर व हजारो नागरिकांच्या साक्षीने विवाह सोहळा अगदी शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने संपन्न झाला. विवाह सोहळ्याची सुरवात वधु वरांच्या मिरवणुकीने झाली .

संत तुकारम सभागृहातून १६ नवरदेव ढोल ताश्यांच्या गजरात गांधी चौकातून वाजतगाजत विवाह मंडपात आले. मंडपाच्या प्रवेश द्वारावर सुहाशिनिनी सर्व वरांचे भारतीय संस्कृती कुंकू तिलक व पुष्प वर्षावाने स्वागत केले .वर-वधू विवाह मंडपात स्थानापन्न झाल्यावर नियोजित मान्यवरांच्या हस्ते संत तुकाराम महाराज ,छत्रपती शिवाजी महाराज ,महात्मा फुले ,सावित्रीमाई फुले ,राजर्षी शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून विवाह सोहळ्याला सुरवात झाली. स्वागताध्यक्ष सुनील फुंडे यांनी मान्यवरांचे स्वागत केले . कार्यक्रमाच्य अध्यक्षस्थानी खासदार प्रशांत पडोळे ,नियोजित उद्घाटक प्रफुल पटेल विवाह सोहळ्याला अनुपस्थित असल्याने आमदार राजू कारेमोरे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले .विशेष अतिथी म्हणून आमदार नाना पाटोले , आमदार परिणय फुके ,आमदार नरेंद्र भोन्डेकर ,माजी राज्यमंत्री नाना पंचबुद्धे ,माजी खासदार मधुकर कुकडे ,माजी खासदार सुनील मेंढे ,माजी आमदार सेवक वाघाये ,समाजभूषण शालीकराम कुकडे ,दुग्ध उत्पादन संघाचे अध्यक्ष रामलाल चौधरी ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भाऊराव तुमसरे ,बांधकाम सभापती नरेश ईश्वरकर ,जिल्हा परिषद सदस्य विनोद बांते ,देवा इलमे ,महात्मा जोतीबा फुले मार्केटचे अध्यक्ष महेंद्र मेंढे ,संचालक नरेंद्र बुरडे, पांडुरंग खाटीक, जयकृष्ण फेंडरकर समाजाचे अध्यक्ष सदानंद इलमे, मुख्य संयोजक डॉ. बाळकृष्ण सार्वे इतर मान्यवर उपस्थित होते .


या कार्यक्रमात बोलताना नानाभाऊ पटोले म्हणाले की सर्व जातीय व धर्मीय विवाह सोहळे आवश्यक आहेत. ओबीसी प्रवर्गात सर्वाधिक जाती असल्याने या सर्व जातीं विवाहाच्या माध्यमातून एकत्र आले तर या प्रवर्गाची एकी निर्माण होऊन या समाजाची शक्ती दिसेल, ओबीसी जनगणनेचा लढा व्यापक स्तरावर उभा करता येईल असे मत मांडले.आमदार परिणय फुके म्हणाले की,सामुहिक विवाहचा आदर्श निर्माण होण्यासाठी समाजातील श्रीमंत लोकांनी आपल्या मुलांची विवाह सामुहिक सोहळ्यातून करावी .आमदार राम अस्वले यांनी आपल्या मुलीचा विवाह सामुहिक सोहळ्यात केला तो आदर्श इतरांनी पुढे ठेवावा ,आमदार नरेंद्र भोंडेकर म्हणाले कि समाजच्या नेत्यांनी राजकारण बाजूला सारून समाज उन्नतीसाठी प्रयत्न करावेत तरुणांनी नेत्यांचा आदर्श समोर ठेवण्यापेक्षा प्रशासकीय अधिकारी कसे होता येईल याकडे लक्ष्य द्यावे असे मत मांडले .तर आमदार राजू कारेमोरे बोलताना म्हणाले कि,आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी तरुण- तरुणींनी सामुहिक विवाह सोहळ्याच्या आग्रह धरावा असे मत मांडले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष खासदार प्रशांत पडोळे म्हणाले मानवता व आर्थिक दृष्टीकोन लक्षात घेऊन सर्व जातीय विवाह सोहळा दरवर्षी घ्यावेत असे मत मांडले.

या प्रसंगी सर्व वर वधूना बावणे कुणबी समाजाच्या वतीने संसाराल उपयुक्त वस्तू समाजातील सुहाशिनी मंगला डहाके ,जयश्री बोरकर ,रोशनी पडोळे,अंजली बांते, स्मिता सिंगनजुडे ,स्वाती सेलोकर शुभधा झंझाड, मीरा टिचकुले, सुरेखा खाटिक,आशा गायधनी, कांता बांते यांच्या हस्ते देण्यात आले.उपस्थित सर्व पाहुणेमंडळी व उपस्थित वऱ्हाडी यांना भोजन व्यवस्था आणि थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली. योग्य नियोजन व सुव्यवस्था यामुळे सामुहिक विवाह सुरूच राहावे असे मत वधू- वरांच्या पालकांनी व्यक्त केले.

सर्व जातीय विवाह सोहळा आयोजित केल्याबद्दल बावणे कुणबी समाज सेवा मंडळाचे आभार मानले. कुणबी समाजाने आयोजित २४ व्या विवाह कार्यक्रमाचे संचालन प्रा. उमेश सिंगनजुडे,स्वाती सेलोकर व मनोज बोरकर यांनी केले तर, प्रास्ताविक मंडळाचे अध्यक्ष सदानंद इलमे तर आभार वामनराव गोंधुळे यांनी मानले .विवाह सोहळा यशस्वी होण्यासठी डॉ.बाळकृष्ण सार्वे ,प्रभू मने, अनिल गायधने ,विवेक पडोळे, रुपेश टांगले मधुकर चौधरी,के.झेड शेंडे महेश कुथे ,शंकरव निंबार्ते, उमेश मोहतुरे, नीलकंठ कायते,जनार्धन वैद्य, भाऊराव सार्वे,गोपाल सेलोकर, विष्णू जगनाडे, विठ्ठल सार्वे, भाऊराव सार्वे,दुयीधन अतकरी यांनी सहकार्य केले.

RNI No.- MAHAMAR-2010/35801 **महासागर भंडारा** **मालक, मुद्रक, प्रकाशक -** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक-** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)




# ‘घिबली’चा प्रताप, स्वामी समर्थांऐवजी साईबाबांचा फोटो

गेल्या काही दिवसांपासून ‘सोशल मीडिया’वर ‘घिबली इमेजेस’ने धुमाकूळ घातला आहे. ‘घिबली इमेज’ हे ‘आर्टिफिशिअल इंटेलिजन्स’ असणारे तंत्रज्ञान असून या माध्यमातून चॅटजीपीटीवर स्वतःच्या ॲनिमेटेड प्रतिमा तयार करता येतात. आतापर्यंत कोट्यवधी यूजर्सनी ‘घिबली इमेजेस’चा वापर करून आपल्या प्रतिमा तयार केल्या आहेत. भारतासह जगभरातून याला प्रचंड प्रतिसाद मिळाल्याने ‘ओपन एआय’चे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स असणारे हे टूल बंद पडले होते. ‘घिबली इमेज’ तयार करून घेण्यासाठी एकाच वेळी लाखो यूजर्स ‘चॅटजीपीटी’चा वापर करत असल्याने ‘ओपन एआय’च्या सर्व्हरवर प्रचंड दबाव पडला. त्यामुळे घिबली इमेज तयार करताना अनेक चुकाही होत आहेत.

यापैकी काही फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. एका फोटोत महिलेने नवरा आणि दोन लहान मुलींसह ‘घिबली’वर फोटो अपलोड केला होता; मात्र त्याची ॲनिमेटेड इमेज तयार होताना फोटोत नवऱ्याऐवजी दुसराच लहान मुलगा दिसत आहे. दुसऱ्या एका फोटोत एका जोडप्याने गुढीपाडव्याचा फोटो टाकला. गुढीसह नवरा-बायकोचा फोटो अपलोड करण्यात आला. मात्र प्रत्यक्ष ‘घिबली इमेज’ तयार होताना गुढीच्या ऐवजी एक पाठमोरी बाई दिसली. या सगळ्यावर कळस म्हणजे ‘एआय टूल’ला अक्कलकोटचे स्वामी समर्थ आणि साईबाबांमध्ये फरक ओळखता आलेला नाही.

**डोक्यावर हात मारून घेण्याची वेळ**

एका यूजरने स्वामी समर्थांच्या प्रकटदिनी त्यांच्या तसबिरीसोबत फोटो काढला होता. या फोटोची ‘घिबली इमेज’ तयार करण्यासाठी यूजरने तो ‘चॅटजीपीटी’वर अपलोड केला. मात्र प्रत्यक्षात इमेज आली तेव्हा डोक्यावर हात मारून घेण्याची पाळी आली. कारण या इमेजमध्ये स्वामी समर्थांऐवजी साईबाबा दिसत होते.

**सर्व्हरवर प्रचंड ताण**

‘चॅटजीपीटी’ मध्ये ‘घिबली इमेज’च्या फ्री व्हर्जनवर सुरुवातीला कितीही फोटो तयार करता येत होते. मात्र सर्व्हरवरील ताण वाढल्यामुळे ‘चॅटजीपीटी’ने फ्री व्हर्जन यूजर्सना एका दिवसात केवळ तीन इमेज तयार करून देण्याचे ठरवले. या सगळ्यामुळे ‘ओपन एआय’चे सीईओ सॅम अल्टमन यांना ट्वीट करण्याची वेळ आली होती. त्यांनी यूजर्सना ‘घिबली इमेज’ तयार करण्यापासून ब्रेक घेण्याचे आवाहन केले होते. ‘आमच्या टीमला झोपेची गरज आहे.

# हजारो कोटींची मालमत्ता, तरी विकतो भाजी

# कॅलिडोस्कोप



नावाची सुरुवात ‘युवराज’ आणि शेवट ‘शिंदे’ या आडनावाने होत असलेल्या एका व्यक्तीची लक्झरी लाइफस्टाइल अतिशय वेगळी आहे. त्याच्या खांद्यावर राजघराण्याचा वारसा आहे. राहण्यासाठी ४० हजार कोटी रुपयांचा ‘जय विलास पॅलेस’ आहे. तिजोरीत अब्जावधींची संपत्ती आहेत. थोडक्यात या राजपुत्राकडे वैभवाची कमतरता नाही; परंतु ग्वाल्हेर राजघराण्यातील या राजपुत्राने वडिलोपार्जित संपत्ती आणि प्रसिद्धी नव्हे तर मनाला भावणारे काम निवडले आणि यातूनच तो स्वतःची ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. कोट्यवधींची संपत्ती असूनही युवराज महाआर्यमान शिंदे भाजीपाला विक्री कंपनी चालवत आहेत.

युवराज राजघराण्याच्या वैभवाने समृद्ध आहे. अफाट संपत्तीमुळे उत्पन्नाची काळजी नाही. परंतु शिंदे घराण्यातील राजकुमारची विचारसरणी वेगळी आहे. वडील ज्योतिरादित्य शिंदे यांच्या राजकारण आणि राजघराण्यातील वारसा सोडून त्यांनी चक्क फळे आणि भाज्या विकण्यास सुरुवात केली. राजकुमार राजवाड्यातील भाज्या विकत असल्याने लोक थट्टा करत होते. पण त्याला न जुमानता महाआर्यमनने स्वतःहून काहीतरी करण्याचा निर्धार केला.

**युवराज भाजी विकतो**

डून स्कूलमध्ये शिकत असतानाच नाव स्वतः कमवेल असे महाआर्यमनने ठरवले होते. मग एका मित्रासवे २०२१ मध्ये त्याने ‘मायमंडी’ नावाचा स्टार्टअप सुरू केला. महाआर्यमन मायमंडीचा सह-संस्थापक आहे. सध्या तो व्यवसायाच्या कल्पना पुढे नेण्यात व्यस्त आहे. सुरुवातीला तो स्वतः सकाळी लवकर उठून बाजारात जाऊन ताजी फळे आणि भाज्या खरेदी करायचा आणि ॲपद्वारे लोकांपर्यंत पोहोचवायचा.

**परदेशी शिक्षण**

डून स्कूलमधून सुरुवातीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याने येल विद्यापीठातून पदवी प्राप्त केली. बोस्टन कन्सल्टिंग ग्रुप आणि सॉफ्टबँक सारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये काम केल्यानंतर त्याने आता स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. त्याचे स्टार्टअप मोठ्या प्रमाणात भाज्या खरेदी करते आणि लोकांपर्यंत पोहोचवते. कंपनी समुदायाला ताज्या भाज्या आणि फळांसाठी पुश कार्ट पुरवते. आज अनेक शेतकरी त्यांच्या स्टार्टअपशी जोडलेले आहेत. महाआर्यमन म्हणतो, की तो सध्या आठ कोटी रुपयांची गुंतवणूक उभारण्याच्या योजनेवर काम करत आहे.

# १२३ वर्षांची प्रकाशमान सेवा

बाजारातून स्वस्त बल्ब विकत घेतला तर त्याची गॅरंटी मिळत नाही. ‘चले तो शाम तक, नही तो चाँद तक...’ असे गमतीने दुकानदारही सांगतो. दुसरीकडे महागडा बल्ब आणला तर त्याची एक वा जास्तीत जास्त दोन वर्षांची हमी असते. पण एक बल्ब १२३ वर्षे सतत जळू शकतो असे सांगितले तर कदाचित विश्वास बसणार नाही. मात्र ही बातमी खरी आहे.

जगात असा एक बल्ब असून तो १९०१ पासून अव्याहत जळत आहे. ‘लिव्हरमोर सेंटेनियल लाइट बल्ब’ नामक हा बल्ब कॅलिफोर्नियातील लिव्हरमोर शहरात असणाऱ्या फायर स्टेशन क्रमांक सहा मध्ये बसवण्यात आला होता. हे स्टेशन शेल्बी इलेक्ट्रॉनिक कंपनीने १९०१ मध्ये बांधले होते आणि तेव्हापासून तेथे बल्ब जळत आहे.



**वंडर बल्ब**

इलेक्ट्रिक बल्ब कधी निकामी होईल याची शाश्वती नसते. दुकानातून कोणताही इलेक्ट्रिक बल्ब खरेदी केल्यावर कंपन्या केवळ एक वा दोन वर्षांची हमी देतात. मात्र वर उल्लेख केलेला ‘वंडर बल्ब’ अनोखा आहे.

**जागतिक विक्रम**

इतका प्रदीर्घ काळ अव्याहत जळत असल्यामुळे त्याच्या नावे जागतिक विक्रमही नोंदवला गेला आहे. अलिकडेच त्याला ‘गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’मध्ये स्थान देण्यात आले आहे. पूर्वी हा बल्ब ६० वॅटचा होता. मात्र आता तो केवळ ४ वॅटचा प्रकाश देऊ शकतो.



# ताजमहाल रात्री अंधारात का?

जगातील सात आश्चर्यांपैकी एक असणारा ताजमहाल मोगल सम्राट शाहजहानने पत्नी मुमताज महलच्या स्मरणार्थ बांधला. मात्र या ताजमहाल परिसरात रात्रीच्या वेळी दिवे लावले जात नाहीत. तिथे अंधार असतो. यामागील कारण क्वचितच कोणाला माहिती असेल. ताजमहाल हे प्रेमाचे प्रतीक मानले जाते. वर्षभरात इथे लाखो पर्यटक येतात. यमुना किनारी ही सुंदर वास्तू सगळ्यांना आकर्षित करते. मोगल सम्राट शाहजहान यांनी ही वास्तू बांधली. आपल्या १४ व्या बाळाला जन्म देताना मुमताज यांच्या मृत्यू झाला. त्या वेळी १६३२ मध्ये ताजमहाल बांधण्यास सुरवात केली. ही अद्भुत वास्तू बांधण्यासाठी २०,००० कारागीर, शिल्पकार तब्बल २२ वर्ष मेहनत करत होते.

**देशभरातील वस्तू**

ताजमहलसाठी राजस्थानमधून पांढरे संगमरवर, दक्षिण भारतातून जाड दगड तर तुर्की, अफगाणिस्तान आणि चीनमधून महागडे रत्न मागविण्यात आले होते. या महालामध्ये २२ खोल्या आहेत. पुढे त्या बंद करण्यात आल्या. या खोल्या १९३४ मध्ये निरीक्षणाच्या वेळी उघडल्या गेल्या होत्या. तेव्हापासून आजपर्यंत त्या उघडल्या गेल्या नाहीत.

**९१ वर्षे खोल्या बंद**

२०२२ मध्ये या खोल्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. मात्र कोर्टाने ती फेटाळली. ताजमहाल पर्यटकांसाठी सकाळी सहा वाजता उघडतो आणि संध्याकाळी ६.३० वाजता बंद होतो.

**सौंदर्य जपण्यासाठी लाईट बंद**

ताजमहाल परिसरात लाइट्स लावल्यास किडे आकर्षित होतील आणि संगमरवरी दगडाच्या भिंतीला चिकटतील. यामुळे ताजमहालचे सौंदर्य खराब होईल. वायू प्रदूषणामुळे टाइल्स खराब होतील. असेही १९९७ पासून सुरक्षेच्या कारणास्तव रात्रीच्या वेळी येथे दिवे वापरण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने या संदर्भात एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. ताजमहालची स्वच्छता आणि सुरक्षितता लक्षात घेऊन सरकारने हा निर्णय घेतला आहे.

**दर शुक्रवारी बंद**

ताजमहाल दर शुक्रवारी बंद राहतो कारण तो दिवस प्रार्थनेसाठी राखीव असतो. पर्यटकांना विशेषतः पौर्णिमेच्या रात्री प्रवेश दिला जातो. भारतीय नागरिकांसाठी प्रवेश शुल्क ५० रुपये आहे तर परदेशी पर्यटकांसाठी ते १,१०० आहे. ताजमहालचा मुख्य मकबरा पूर्णपणे भूमिगत आहे. यमुना नदीच्या काठावर असणाऱ्या या इमारतीचा पाया मजबूत करण्यासाठी मोगलांनी एका विशेष स्थापत्य शैलीचा वापर केला. ताजमहाल दिवसा पांढरा, संध्याकाळी लाल आणि चांदण्या रात्री निळ्या रंगात चमकतो. मोगल राजवटीच्या समाप्तीनंतर ब्रिटिश काळात ताजमहालवर हल्ला झाला आणि त्यातील मौल्यवान रत्ने लुटण्यात आली. हा इतिहास आज अनेकांना माहिती नाही.



# विवेकबुद्धीचे तीन तेरा

या जगात कोण काय मानत असेल याचा नेम नाही. श्रद्धा आणि अंधश्रद्धा पाळणारे बरेचजण असतात. काही गोष्टींचा तर्कही लावता येत नाही. तर अशीच एक अतर्क्य बाब म्हणजे १३ हा आकडा. जगभरात अनेकजण १३ या आकड्याला अशुभ मानतात. अर्थात या आकड्याबद्दल असणाऱ्या भीतीला शास्त्रीय भाषेत ‘ट्रिस्काइडेकाफोबिया’ किंवा ‘थर्टीन डिजिट फोबिया’ असे म्हणतात. अनेकजण १३ या आकड्याचा उच्चारही करत नाहीत. पाश्चिमात्य देशांमध्ये १३ या आकड्याबाबत बरीच अंधश्रद्धा आहे. म्हणूनच काही हॉटेल्समध्ये खोलीला १३ हा क्रमांक दिला जात नाही तर बरेच लोक १३ क्रमांकाच्या खोलीत रहायला नकार देतात. भारतातही अनेकांना १३ हा आकडा अशुभ वाटतो. गंमत म्हणजे चंडीगढमध्ये १३ क्रमांकाचा सेक्टरच नाही. चंडीगढ हे सुनियोजित शहर आहे. या शहराची रचना परदेशी आर्किटेक्टने केली होती, मात्र १३ या आकड्याची भीती वाटत असल्यामुळे त्याने चंडीगढमध्ये १३ क्रमांकाचा सेक्टरच ठेवला नाही!




# ...त्यांच्यासाठी वेगळी लेन

सध्याच्या काळात स्मार्टफोनने माणसांचा ताबा घेतला आहे. रस्त्यावर चालताना चॅट करणारे, सेल्फी घेणारे, गेम खेळणारे अनेकजण दिसतात. दुचाकीस्वार गाडी चालवत असताना कानाला फोन लावून बोलत असतात. यामुळे अपघात होण्याची शक्यता अनेकपटींनी वाढली आहे. अपघात झाला तरी हरकत नाही पण स्मार्टफोन सोडायचा नाही अशीच जणू लोकांची मानसिकता झाली आहे. मात्र स्मार्टफोनचा वाढता वापर बघता चीनमधल्या बऱ्याच रस्त्यांवर मोबाईल वापरणाऱ्यांसाठी वेगळ्या लेन्स तयार करण्यात आल्या आहेत. मोबाईल वापरकर्त्यांनाच या लेनमध्ये प्रवेश दिला जातो. याच धर्तीवर इंग्लंडमधल्या मँचेस्टरमध्येही मोबाइल लेन तयार करण्यात आली आहे. ‘मोबाइल फोन लेन’ याच नावाने ती ओळखली जाते. युरोपमध्ये पहिल्यांदाच हा प्रयोग करण्यात आला. बँकॉकच्या एका रस्त्यावरही अशाच प्रकारे मोबाइल लेन तयार करण्यात आली आहे. स्मार्टफोन हातात घेऊन चालण्याचे धोके लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सिंगापूरमध्ये रस्त्यावर पिवळ्या पट्ट्या आखण्यात आल्या आहेत. त्यावर ‘नो मोबाइल फोन’ असे लिहिण्यात आले आहे. दक्षिण कोरियात रस्त्यावर एलईडी लाईट्स बसवण्यात आले आहेत. यामुळे रस्ता ओलांडताना लोक सजग असतात. स्मार्टफोनचा वाढता वापर बघता आता मोबाइल फोन वापरणाऱ्यांसाठी खास लेनची सोय करायची वेळ आली आहे, असेच म्हणावे लागेल. स्मार्टफोनचे हे व्यसन आपल्याला कुठे घेऊन जाणार हे कळायला मार्ग नाही. हा विळखा सैल करण्याची गरज आहे, हे आतातरी समजून घ्यायला हवे.

# स्टेशनवर जेवणाची पंगत

सर्वात जलद आणि स्वस्त पर्याय म्हणून भारतातील लाखो प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. प्रवाशांसाठी रेल्वेतर्फे अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. यात प्रवाशांना जेवणही दिले जाते. मात्र प्रवास करणाऱ्या प्रवाशांना रेल्वेत नाही तर चक्क रेल्वे स्थानकावर जेवण दिले जाणारे एक ठिकाण आहे. एका रेल्वेच्या मार्गात येणाऱ्या



सहा स्टेशनवर पंगत असते. स्थानकांवर रेल्वे थांबल्यावर प्रवासी उतरतात आणि पंगतीमध्ये जेवणाचा आस्वाद घेतात.

या ट्रेनचे नाव आहे अमृतसर-नांदेड सचखंड एक्सप्रेस. मागील २९ वर्षांपासून ही ट्रेन सुरू असून त्यातील सर्व प्रवाशांना मोफत जेवण दिले जाते. या ट्रेनने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बरोबर अन्नपदार्थ घेऊन जावे लागत नाही. मात्र प्रवास करणारे प्रवासी ताट आणि वाटी बरोबर ठेवतात. या ट्रेनमध्ये एक पँट्री कार असली तरी तिथे अन्न शिजवले जात नाही.

**सर्व प्रवाशांना जेवण**

१९९५ मध्ये सुरु झालेल्या अमृतसर-नांदेड सचखंड एक्सप्रेसचा संपूर्ण प्रवास २०८१ किलोमीटरचा आहे. ती ३९ स्थानकांवर थांबते. धार्मिक पर्यटनासाठी ही साप्ताहिक ट्रेन लोकप्रिय आहे. तीमधून प्रवास करणारे सर्व प्रवासी स्वतःची भांडी घेऊन येतात. जनरल ते एसी कोचपासूनचे सर्व प्रवासी एकत्र स्टेशनवर उतरून लंगरचा लाभ घेतात. नांदेड, मनमाड, भोपाल, ग्वाल्हेर, दिल्ली आणि भुसावळ रेल्वे स्थानकांवर सर्व प्रवाशांना मोफत जेवण दिले जाते. ट्रेन थांबल्यावर सर्व प्रवासी उतरतात आणि जेवण करतात.

**दररोज बदलतो मेनू**

या ट्रेनमधील लंगर मेनू दररोज बदलतो. बरेचदा कढी-भात, छोले-भात, डाळ, खिचडी, बटाटा-फुलकोबी करी, सफरचंद करी, हिरव्या भाज्या, हंगामी भाज्या असा मेनू असतो. मागील २९ वर्षांत असा एकही दिवस गेला नाही, जेव्हा प्रवाशांना जेवण दिले गेले नाही. कोणत्याही कारणास्तव ट्रेन उशिरा आली तर सेवादार ट्रेनची वाट पाहतात. दररोज २००० हून अधिक प्रवासी येथे मोफत जेवण करतात. गुरुद्वाराला मिळालेल्या देणग्यातून जेवणाचा खर्च भागवला जातो आणि गुरुद्वाऱ्यात सेवा देणारे सेवेकरु प्रवाशांना जेवण वाढतात.





# रक्ताचे विभिन्न रंग

रक्त म्हटले की ते लाल रंगाचेच असते. पण जगातल्या काही सजीवांच्या रक्ताचा रंग लाल नाही तर निळा, हिरवा, पिवळा आहे. ऑक्टोपस या आठ पायांच्या सागरी जीवाचे रक्त निळ्या रंगाचे असते. शरीरात तांब्याचे प्रमाण बरेच जास्त असल्यामुळे त्याच्या रक्ताचा रंग निळा असतो. सी क्युकंबर नावाचा एक सजीव आहे. काकडीच्या आकाराचा हा जीव समुद्रात आढळतो. या सजीवाचा रंग हिरवा असला तरी त्याचे रक्त मात्र पिवळ्या रंगाचे असते. या मागचे कारण मात्र अजूनही उलगडलेले नाही.

पीनट वॉर्म नावाचा एक कीटक आहे. या किड्याचे रक्त जांभळट रंगाचे असते. पीनट वॉर्मच्या शरीरात हिमोरिथरीन नामक घटक असतो. ऑक्सिजनशी संपर्क आल्यानंतर या घटकाचा रंग जांभळट होतो. यामुळे पीनट वॉर्मच्या रक्ताचा रंग जांभळा असतो.

न्यू गिनी नामक सरड्याचे रक्त हिरव्या रंगाचे असते. त्याचे स्नायू आणि जीभेचा रंगही हिरवाच असतो.

क्रोकोडाइल आईसफिश नामक मासा मासा मारीसारखा दिसतो. विशेष म्हणजे या माशाचे रक्त रंगहीन असते. तसंच ते पारदर्शकही असते. हिमोग्लोबिन आणि हेमोसाइनिन नामक घटक नसल्यामुळे ते रंगहीन असतं.

# अजबगजब गुहा

आजवर तुम्ही विविध गूढ गुहांबद्दल ऐकले असेल. पण व्हिएतनाममधली एक गुहा अनेक अर्थांनी अनोखी आहे. ही जगातली सर्वात मोठी गुहा असल्याचे म्हटले जाते. या गुहेत वेगळेच जग वसले आहे. गुहेतून चित्रविचित्र भीतीदायक आवाज येत असतात. हे आवाज ऐकून कोणाचाही थरकाप उडाल्याशिवाय रहाणार नाही. ‘हँग सोंग डूंग’ नावाची ही गुहा नऊ किलोमीटर लांब, २०० मीटर रुंद आणि १५० मीटर उंच आहे. या गुहेत झाडे, झुडपे, घनदाट जंगले, नदी आदी बरेच काही आहे. लाखो वर्षांपूर्वीची ही गुहा २०१३ मध्ये पर्यटकांसाठी खुली करण्यात आली. ही गुहा अत्यंत धोकादायक असल्यामुळे दर वर्षी फक्त २५० ते ३०० लोकांनाच तिथे जाण्याची परवानगी मिळते. १९९१ मध्ये हो खानह नामक स्थानिकाने या गुहेचा शोध लावला. पण आतून येणाऱ्या भयंकर आवाजांमुळे कोणीही इथे येण्याची हिंमत करू शकले नाही. २००९ मध्ये गुहा जगाच्या नकाशावर आली. २०१० मध्ये शास्त्रज्ञांनी २०० मीटर उंच भिंत ओलांडून गुहेत प्रवेश करण्याचा रस्ता शोधला. या गुहेत जाण्यासाठी भरपूर खर्च करावा लागतो. मात्र इथला अनुभव भन्नाट असतो. या गुहेत प्रवेश करण्याआधी पर्यटकांना प्रशिक्षण घ्यावे लागते. तब्बल सहा महिन्यांच्या खडतर प्रशिक्षणानंतर रहस्यमयी गुहेत जाण्याची परवानगी मिळते.



# पिंक ई-रिक्षा हे महिला सक्षमीकरण सुरक्षेच्या दिशेने महत्वाचे पाऊल : देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :



महाराष्ट्र शासनाने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने विविध निर्णय घेतले असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. महिला व बाल विकास विभागाच्या वतीने महिलांद्वारे महिलांसाठी संचालित पिंक ई-रिक्षा योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण आणि त्यांच्या सुरक्षेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. लाभार्थी महिलेच्या पिंक ई-रिक्षातून प्रवास करत त्यांनी महिलांना कृतिशील विश्वासही दिला.

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या वतीने येथील नियोजन भवनात आयोजित कार्यक्रमात पिंक ई-रिक्षा योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र महिला लाभार्थ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पिंक ई-रिक्षा वितरित करण्यात आल्या, त्यावेळी ते बोलत होते. महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, आमदार संदीप जोशी आणि डॉ. आशिष देशमुख, महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव, महिला व बाल विकास आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासन कटिबद्ध असून विविध योजनांच्या माध्यमातून हे कार्य प्रभावीपणे सुरू आहे. महिला व बालविकास विभागाने पिंक ई-रिक्षा या महत्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून गरजू महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. तसेच कामकाजी महिलांना या महिलांच्या ऑटो रिक्षामध्ये बसून सुरक्षित प्रवास करण्याची हमीही या योजनेने दिली आहे. नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र लाभार्थी महिलांना ई-रिक्षा वितरित झाल्या असून जिल्ह्यात २ हजार महिलांना या योजनेअंतर्गत ई -रिक्षा वितरीत होवून रोजगार उपलब्ध होणार आहे.

नागपूर शहरातील विविध मेट्रो स्टेशनवर प्रवाशांना फिडरसेवा उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बाल विकास विभाग आणि महामेट्रो दरम्यान करार झाला आहे. यातून पिंक ई-रिक्षाधारक महिलांना हक्काचा रोजगार उपलब्ध होणार आहे. राज्याच्या पर्यटन विभागासह अन्य विभागासोबत भविष्यात असे करार करून या महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यावेळी म्हणाल्या, राज्य शासनाने महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महत्त्वाकांक्षी पिंक ई-रिक्षा ही योजना आणली आहे. राज्यातील आठ जिल्ह्यात ही योजना राबविण्यात येत असून पहिल्या टप्प्यात येत्या सहा महिन्यात पाच हजार रिक्षा वितरीत करण्याचे उद्दिष्ट आहे. नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र महिला लाभार्थ्यांना ई - रिक्षा वितरित करून पहिल्या टप्प्यातील वितरणाची सुरुवात झाली आहे. या महिलांना किमान दहा दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. पाच वर्षांचा रिक्षाचा मेंटेनन्स आणि चार्जिंग ची व्यवस्था ही त्यांना करून देण्यात आली आहे. महामेट्रो सोबत करार करून फिडर सेवेअंतर्गत या महिलांच्या ई-रिक्षाची सेवा उपलब्ध होऊन त्यांना रोजगारही मिळणार आहे.

# विकास कामांना गती द्या : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :




नागपूर शहराच्या विविध विकास कामांचा केंद्रीय भूपृष्ठ व राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आढावा घेतला व कालबद्ध पद्धतीने या विकास कामांना पूर्ण करावे, असे निर्देश बैठकीत दिले.

नागपूर शहरात सुरू असलेल्या विविध विकास कामांचा शनिवारी (ता. १९) महापालिकेच्या मुख्यालयातील सभाकक्षात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आढावा घेतला. या बैठकीला आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, आमदार संदीप जोशी, महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळाचे महासंचालक ब्रिजेश दीक्षित, माजी आमदार सुधाकर देशमुख, माजी आमदार सुधाकर कोहळे, माजी आमदार डॉ. मिलिंद माने, माजी आमदार विकास कुंभारे, माजी महापौर दयाशंकर तिवारी, महापालिकेच्या मुख्य अभियंता श्रीमती लीना उपाध्ये यांच्यासह महापालिका, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हाधिकारी कार्यालय आणि इतर महत्वपूर्ण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

आजच्या बैठकीत नागपूर शहरातील व्यापार संकुलाच्या प्रस्तावित बांधकामाच्या सद्यस्थितीवर चर्चा करण्यात आली. यात कॉटन मार्केट, संत्रा मार्केट, नेताजी मार्केट, एस. टी. स्टँड, डीक दवाखाना, सक्करदरा मार्केट, शनिवारी मार्केट, दही बाजारमध्ये व्यापार संकुलाच्या प्रस्तावित बांधकामाचा आढावा घेण्यात आला. यावेळी या व्यापार संकुलाच्या प्रस्तावित विकास कामांचे पीपीटीच्या आधारे सादरीकरण करण्यात आले.

शहरातील घनकचरा व्यवस्थापन व प्रक्रियेसंदर्भात कंपन्यांनी केलेल्या कामाची माहिती यावेळी देण्यात आली. शहरातील शुक्रवारी तलाव, लेंडी तलाव व नाईक तलावाच्या खोलीकरण व सौंदर्यीकरणाच्या कामाबाबत यावेळी चर्चा करण्यात आली व कामाचा आढावा घेण्यात आला.

नागपूर शहराचा पाणी पुरवठा झोननिहाय करण्याच्या मागणीवर यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी महाल भागातील कल्याणेश्वर मंदिराबाबतच्या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. नागपूर जिल्ह्यातील स्मार्ट व्हीलेज प्रकल्पाची सद्यस्थितीची माहिती यावेळी देण्यात आली. शहरातील यशवंत स्टेडीयम व सोख्ता भवनचा विकास करण्याच्या संदर्भात सद्यस्थिचीचा आढावा यावेळी घेण्यात आला. उत्तर नागपुरातील बाभुळपेठ येथे विज्ञान केंद्र स्थापन करण्याच्या संदर्भात चर्चा करण्यात आली.

नागपूर शहरात सिमेंट रस्ते बांधकाम टप्पा - ५ साठी निधी उपलब्ध करण्याकरीता शासनास प्रस्ताव सादर करण्याच्या प्रस्तावावर यावेळी चर्चा करण्यात आली. त्याचप्रमाणे शहरातील अग्निशमन दलाच्या सध्याची व्यवस्थेसाठी पदनिर्मिती तसेच नवीन वाहने घेण्याच्या संदर्भात यावेळी आढावा घेण्यात आला. गेल्यावर्षी अतिवृष्टीमुळे नुकसान ग्रस्त भागाचा विकास करण्यासाठी राज्य सरकारकडून मिळालेल्या निधीच्या विनियोगाबद्दल तसेच कामाचा आढावा यावेळी घेण्यात आला. टीबी वॉर्डच्या बाजूला असलेल्या केंद्र सरकारच्या क्षेत्रीय कौशल्य विकास पुनर्वसन व दिव्यांग सशक्तीकरण केंद्रला (सीआरसी) लावण्यात आलेला मालमत्ता कर व सेवाशुल्क माफ करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठकीत पावसाळा सुरू होण्यापूर्वी नाले सफाई, वसाहतीतील पावसाळी नाल्यांची सफाई, गडरलाईनची साफसफाई तसेच रस्त्यांच्या कडेला असलेल्या झाडांच्या फांद्या तोडण्याचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी दिले. नागपूर सुधार प्रन्यासने नंदनवन, कळमना व त्रिमूर्तीनगरात बांधलेल्या गृह प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला.

# उष्माघाताचे दोन बळी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

यंदाच्या मोसमात नागपुरात शनिवारी ४४.७ अंश कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. वाढत्या तापमानामुळे अंगाची लाही लाही होत असून दुपारच्या सुमारास रस्ते निर्मनुष्य होत आहेत. उष्ण वातावरणात बेघर आणि निराधार लोकांचे जगणे कठीण होत आहे. अशातच शनिवारी शहरात दोघांचा मृत्यू झाला. दोघांच्याही मृत्यूचे कारण अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही. उष्माघाताने त्यांच्या मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे.

उष्माघातापासून बचाव करण्यासाठी निराधार आणि बेघर लोकांसाठी मनपाची निवारा योजना आहे. त्याअंतर्गत बेघर असलेल्यांची त्या ठिकाणी राहण्याची सोय करण्यात आली आहे. दरम्यान शनिवारचा दिवस नागपूरकरांसाठी सर्वात उष्ण ठरला. अंगाची लाही लाही करणाऱ्या उष्णतेमुळे घराबाहेर पडणे सोडा घरात राहणेही कठीण झाले होते. अशातच रस्त्यावर फिरणारे आणि ज्यांना घर नाही, असे दोघे जण अजनी ठाण्याच्या हद्दीत बेशुद्धावस्थेत मिळून आले. सकाळी ११ वाजताच्या सुमारास तुकडोजी पुतळा ते मेडीकल चौक दरम्यान एक ५० वर्षे वयोगटातील अनोळखी इसम बेशुद्धावस्थेत मिळून आला. त्याच्या अंगात पांढऱ्या रंगाची बनियान आणि गळ्यात रंगीबेरंगी दुपट्टा होता. पोलिसांनी त्याला मेडिकल रूग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. दुसरा व्यक्ती त्याच मार्गावर मिळून आला. पोलिसांनी त्याला रूग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. दोन्ही प्रकरणात पोलिसांनी प्राप्त वैद्यकीय सूचनेवरून आकस्मिक मृत्यूची नोंद केली.

# भूमी अभिलेखच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २० :

एका जमिनीची हद्द निश्चित करण्यासाठी एका व्यावसायिकाकडे ५० लाख रुपयांची लाच मागितल्या प्रकरणी भूमी अभिलेख विभागातील दोन अधिकाऱ्यांविरुद्ध येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला. लाच मागितल्यानंतर व्यावसायिकाने थेट महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे तक्रार दिली होती. पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेकडे याबाबत तक्रार अर्ज देण्यात आला होता. तक्रार अजार्ची पडताळणी करण्यात आल्यानंतर भूमी अभिलेख विभागातील अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी भूमी अभिलेख विभागातील उपअधीक्षक अमरसिंह रामचंद्र पाटील, भूकरमापक किरण येटोळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कुणाल अष्टेकर (४१, रा. शिवाजीनगर, पुणे) या व्यावसायिकाने येरवडा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला.

# मोटारीच्या धडकेत दुचाकीस्वार ज्येष्ठाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २० :

मोटारीच्या धडकेत दुचाकीस्वार ज्येष्ठाचा मृत्यू झाल्याची घटना घोले रस्ता परिसरात घडली. याप्रकरणी मोटार चालकाविरुद्ध डेक्कन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. रेणुकदास नारायण जोशी (वय ६५) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठाचे नाव आहे. याप्रकरणी मोटार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस कर्मचारी योगेश जावळे यांनी डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार रेणुकदास जोशी १५ एप्रिल रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास झाशीची राणी चौकातून घोले रस्त्याकडे निघाले होते. झाशीची राणी चौकातील कोपऱ्यावर मोटारीने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. अपघातात जोशी गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलीस उपनिरीक्षक सावंत तपास करत आहेत. घोले रस्ता परिसरात तीन ते चार उपाहारगृहे आहेत. उपाहारगृहात होणाऱ्या गर्दीमुळे या भागात कायम कोंडी होत असते.

# चित्रपटाची कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात निवड : आशिष शेलार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २० :



महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने फ्रान्समधील कान आंतरराष्ट्रीय चित्रपट तीन मराठी चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. यात 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर' आणि 'खालिद का शिवाजी' या तीन मराठी चित्रपटांचा समावेश आहे. तर 'जुनं फर्निचर' या चित्रपटाची विशेष निवड करण्यात आल्याची घोषणा, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज दादर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली. फ्रान्समध्ये येत्या १४ ते २२ मे २०२५ या कालावधीत कान चित्रपट महोत्सव संपन्न होणार आहे.

कान या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा चार मराठी चित्रपटांची एन्ट्री झाली आहे. महामंडळामार्फत सन २०१६ पासून कान महोत्सवातील फिल्म मार्केटमध्ये मराठी चित्रपट पाठवले जात आहेत. मराठी चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावा आणि जागतिक सिनेप्रेमींना मराठी चित्रपटाची भूरळ पडावी, हा यामागचा हेतू आहे. या चित्रपट निवडीसाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने तज्ज्ञ परीक्षण समिती तयार केली होती. आदित्य सरपोतदार, निखिल महाजन, गणेश मतकरी, इरावती कर्णिक, अपूर्वा शालिग्राम यांचा यात समावेश होता.

भारतातील ग्रामीण भागातील पारंपारिक अरेंज मॅरेज व्यवस्थेवर भाष्य करणारा 'स्थळ' हा चित्रपट आहे. समाजात खोलवर रुजलेली पितृसत्ताक पद्धत, रंगभेद आणि सामाजिक दृष्टिकोन अशा अनेक गोष्टींवर या चित्रपटात प्रकाश टाकण्यात आला आहे.

# चालक प्रशिक्षण केंद्र नागपुरात

**नागपूर** : केंद्र सरकारच्या नवीन धोरणानुसार पहिले खासगी चालक प्रशिक्षण केंद्र (डीटीसी दर्जा) नागपुरात तयार झाले आहे. त्याचे उद्घाटन शनिवारी (१९ एप्रिल) झाले. या केंद्रामुळे वाहन चालवण्याच्या परवान्यासाठी आरटीओत पायपीट करण्याची गरज उरणार नाही.केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनाद्वारे मान्यताप्राप्त एम. वझलवार ड्रायव्हिंग स्कूल प्रायव्हेट लिमिटेड, सावरमेंढा, तालुका सावनेर, जिल्हा नागपूर येथील केंद्रासाठी खासगी तत्वावर संपूर्ण खर्च करण्यात आला आहे. डीटीसी दजार्चे हे प्रशिक्षण केंद्र देशातील पहिले आहे. या केंद्रात दुचाकीपासून जड वाहनापर्यंत सर्व वाहने चालवण्याचे प्रशिक्षण दिले जाईल. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर उमेदवाराला प्रमाणपत्र दिले जाईल. त्यानंतर या प्रशिक्षण केंद्रातच विविध चाचण्या होतील. चाचणीचा अर्ज संबंधित केंद्र चालकाकडून तेथील आरटीओ कार्यालयात जमा केला जाईल. त्यानंतर उमेदवाराला वाहन चालवण्याचा परवाना मिळेल. त्यामुळे आरटीओ कार्यालयात पायपीट करण्याची गरज उरणार नाही. राज्यात सध्या तीन जिल्ह्यात चालक प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (आयडीटीआर) संस्था कार्यरत आहेत. त्यासाठी सरकारकडून आर्थिक मदत केली गेली आहे.

# उमरेडमध्ये आकाशातून कोसळला ५० किलोचा धातूचा तुकडा घराच्या स्लॅबवर पडला ४ फूट लांबीचा तुकडा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० :

जिल्ह्यातील उमरेड शहरात एक धक्कादायक घटना घडली आहे. कोसे ले-आऊट परिसरात आकाशातून एक जड धातूचा तुकडा कोसळला. हा तुकडा अमेय भास्कर बसेशंकर यांच्या घराच्या स्लॅबवर पडला. खगोल अभ्यासक प्रा. सुरेश चोपणे यांनी या तुकड्या बाबत उपग्रहाचा असण्याची शक्यता वर्तवली आहे. घटनेच्या वेळी मोठा स्फोटासारखा आवाज झाला. त्यामुळे परिसरातील नागरिक घाबरून घराबाहेर धावले. कोसळलेला धातूचा तुकडा सुमारे ५० किलो वजनाचा आहे. तो १० ते १२ मिमी जाडीचा आणि सुमारे ४ फूट लांबीचा आहे. तुकडा अर्धवट तुटलेल्या अवस्थेत असून, त्यामुळे घराच्या स्लॅबला आणि भिंतीला किरकोळ नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. अमेय यांनी लगेच उमरेड पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिस निरीक्षक धनाजी जळक यांच्या नेतृत्वाखाली पोलिस पथकाने घटनास्थळी तपासणी केली.

# GTT डेटाच्या हॅकाथॉनद्वारे विद्यार्थ्यांना कौशल्ये आणि नोकऱ्यांची संधी




लोकार्थ

GTT डेटा सोल्यूशन्स लिमिटेड ही बीएसई-सूचीबद्ध, तंत्रज्ञान-आधारित व्यवसाय सोल्यूशन्स पुरवणारी कंपनी आहे, जी मध्यम आकाराच्या कंपन्यांना एआय-चालित ERP आणि डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन टूल्सच्या माध्यमातून सक्षम बनविण्यावर लक्ष केंद्रित करते. भारताच्या उदयोन्मुख टेक्नोलॉजी हब्सकडे लक्ष वेधण्यासाठी, GTT डेटा सोल्यूशन्स वेस्टर्न महाराष्ट्रात आतापर्यंत झालेल्या सर्वात मोठ्या इंटरकॉलेजिएट हॅकाथॉनपैकी एकाचे आयोजन करत आहे Code|Compete| Conquer या थीमखाली आयोजित हा एक ऐतिहासिक सोलो कोडिंग स्पर्धा आहे. सांगली येथे होणाऱ्या या स्पर्धेत सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि सातारा यासह नऊ जिल्ह्यांतील ७५ कॉलेजमधून १,५०० हून अधिक विद्यार्थी सहभागी होत आहेत – पारंपरिक टेक रिक्रूटमेंटमध्ये दुर्लक्षित राहणाऱ्या टियर २ आणि टियर ३ शहरांतील अपार आणि सुप्त कौशल्यांचा ठसा उमठवण्यासाठी ही अनोखी संधी आहे.कौशल्ये आणि प्रत्यक्ष जगातील संधी यामधील अंतर कमी करण्यासाठी हा हॅकाथॉन डिझाइन करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण विचार, समस्यांचे वास्तववादी निराकरण आणि इंडस्ट्री-ओरिएंटेड कोडिंगसाठी प्रोत्साहित केले जात आहे. विजेत्यांना GTT कडून थेट नोकरीच्या संधी, इंडस्ट्री-मान्यताप्राप्त प्रमाणपत्रे, विशेष प्रशिक्षण प्रोग्राम्स आणि बरेच काही मिळणार आहे.ही फक्त एक स्पर्धा नाही – ही भारताच्या लपलेल्या टेक टॅलेंटला जागतिक व्यासपीठावर आणण्याची आणि नाविन्यपूर्ण विचारांचे विकेंद्रीकरण करण्याची मोहीम आहे.

## स्विगी इन्स्टामार्टची मॅक्ससेव्हर योजना

भारतातील आघाडीची क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म स्विगी इन्स्टामार्ट, जी नुकतीच देशातील 100 शहरांमध्ये विस्तारली आहे, तिने मॅक्ससेव्हर या नव्या इन-ॲप फीचरचा शुभारंभ केला आहे. हे फीचर खास करून वापरकर्त्यांना जास्त बचत आणि अधिक मूल्य देण्यासाठी तयार करण्यात आले आहे. हे फीचर ग्राहकाच्या खरेदी अनुभवात सहजपणे समाविष्ट करण्यात आले असून, प्रत्येक ग्राहक आपोआप मॅक्ससेव्हर योजनेत सामील होतो. ठराविक ऑर्डर अमाउंटनंतर ग्राहकांना ॲपर्यंतची अतिरिक्त बचत मिळण्याचा लाभ मिळू शकतो. स्विगी मॅक्ससेव्हरच्या मदतीने ग्राहकांना सर्व श्रेणींमधील वस्तूंवर सर्वोत्तम किंमतीचा लाभ घेता येतो. सध्या स्विगी इन्स्टामार्टकडे 35,000 पेक्षा जास्त उत्पादने उपलब्ध आहेत, ज्यामध्ये किराणा सामान, दैनंदिन वापराच्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स, स्मार्टफोन्स, फॅशन, मेकअप, खेळणी आणि इतर अनेक गोष्टींचा समावेश आहे आणि ही सर्व उत्पादने केवळ 10 मिनिटांत घरपोच दिली जातात.

## टी २० मुंबई लीग सीझन 3 चा चेहरा रोहित शर्मा



मोठ्या उत्साहात परतणाऱ्या T20 मुंबई लीगसाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनने भारताचा कर्णधार आणि मुंबईकर रोहित शर्माची सीझन ३ चा चेहरा म्हणून घोषणा केली. 26 मेपासून सुरू होणारी ही भारतातील आघाडीची स्थानिक फ्रँचायझी आधारित T20 लीग, जबरदस्त थरार, तीव्र स्पर्धा आणि मुंबईतील सर्वोत्तम क्रिकेट प्रतिभेचं प्रदर्शन देणार आहे.ही घोषणा मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत करण्यात आली, ज्यात रोहित शर्मा, MCA अध्यक्ष अजिंक्य नाईक, तसेच अपेक्स कौन्सिल आणि लीग गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य तसेच संघ चालक उपस्थित होते. या कार्यक्रमात MCA ने दोन नवीन संघांचीही घोषणा केली आणि रोडवे सोल्यूशन्स इंडिया इन्फ्रा लिमिटेड व रॉयल एज स्पोर्ट्स अँड एंटरटेन्मेंट यांचे फ्रँचायझी चालक म्हणून स्वागत केले. याच वेळी रोहित शर्मानें सिझन 3 चा भव्य ट्रॉफीचा अनावरणही केला. MCAच्या आयोजनात ही लीग सहा वर्षांच्या विश्रांतीनंतर पुन्हा एकदा परतत आहे आणि Season 3 ला आतापर्यंत प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे, ज्यामध्ये 2800 हून अधिक खेळाडूंनी नोंदणी केली आहे.

## आशीष सराफ आरटीएक्सचा प्रॅट अँड व्हिटनी व्हाईस प्रेसिडेंट म्हणून नियुक्त



आरटीएक्सचा व्यवसाय असलेल्या प्रॅट अँड व्हिटनीने आज भारतातील प्रॅट अँड व्हिटनीचे व्हाईस प्रेसिडेंट आणि कंट्री हेड पदावर आशीष सराफ यांची नियुक्ती केल्याचे घोषित केले. प्रॅट अँड व्हिटनीनेचे सर्वात वरिष्ठ इन-कंट्री लीडर या नात्याने आशीष भारतातील सर्व प्रकारची धोरणात्मक वृद्धी आणि परिवर्तनाच्या प्रयत्नांचे नेतृत्व करतील. ते प्रॅट अँड व्हिटनीचे इन-कंट्री इंजिनियरिंग, ग्राहक सेवा, संचालन, डिजिटल परिवर्तन केंद्रांच्या वृद्धीसाठी आखणीसाठी जबाबदार असतील.

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# ऐतिहासिक महाकाय विहिरीची स्वच्छता मोहीम सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २० :



नागपूर महानगरपालिकेच्या सहकार्याने मोतीबाग रेल्वे कॉलनीतील कामठी रोड येथील भोसले काळातील २०० वर्षे जुन्या विशाल ऐतिहासिक विहिरीच्या स्वच्छतेचे काम अखेर सुरू झाले आहे. ज्या अंतर्गत गेल्या ३ दिवसांपासून विहिरीतून पाणी काढण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. पाण्याचा निचरा करण्यासाठीच्या या स्वच्छता मोहिमेदरम्यान, भोसले काळातील ही ऐतिहासिक विहीर जिवंत आढळली. पहिल्या दिवशी सुमारे एक मीटर पाणी काढल्यानंतर, रात्रीतून १० ते १२ इंच पाणी आपोआप रिचार्ज झाले. दुसऱ्या दिवशीही सुमारे १ मीटर पाणी बाहेर काढण्यात आले. तिसऱ्या दिवशी महापालिकेकडून दुसरा पंप बसवून पाणी बाहेर काढण्यात येत आहे. त्यामुळे आतापर्यंत फक्त १० ते १२ फूट पाणी बाहेर काढण्यात आले आहे. जर महानगरपालिकेने अग्निशमन विभागाच्या पंपांचीही मदत घेतली तर पाण्याचा निचरा जलद होईल. पावसाळ्यापूर्वी ही ऐतिहासिक विहीर स्वच्छ केली जाईल. दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या मोतीबाग कॉलनीमध्ये असलेल्या ऐतिहासिक भोसले काळातील विहिरीला पूर्णपणे जिवंत होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

या भागात पाणीटंचाईच्या वाढत्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर हा एक महत्त्वाचा जलस्त्रोत आहे. सततच्या माध्यमांच्या बातम्या आणि जनतेच्या मागणीनुसार, नागपूर महानगरपालिकेने (एनएमसी) अखेर एसईसीआरच्या सहकार्याने १५० ते २०० वर्षे जुन्या विहिरीची स्वच्छता मोहीम सुरू केली आहे. २७ मार्च रोजी एसईसीआर मंडळ रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) दीपक कुमार गुप्ता आणि अभियांत्रिकी विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीनंतर हे पाऊल उचलण्यात आले आहे, ज्यामध्ये विहीर पुनर्संचयित करण्याचे आणि तिच्या क्षमतेचा पाणीपुरवठा स्त्रोत म्हणून वापर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. डॉ. प्रवीण डबली, माझी विभागीय रेल्वे वापरकर्ते सल्लागार समिती सदस्य जे गेल्या अनेक वर्षांपासून विहिरीच्या पुनरुज्जीवनासाठी प्रयत्न करत आहेत. ते म्हणाले, "विहिरीत सुमारे ४५ फूट पाणी आहे. त्याची खोली ७० फूट असू शकेल. जुने लोक सांगायचे की ही विहीर ७ विहीर खोल आहे. महापालिकेने ६ अश्वशक्तीचे दोन पंप बसवले आहेत आणि गेल्या तीन दिवसांपासून पाणी बाहेर काढण्याची प्रक्रिया सुरू आहे.

अभियानाच्या पहिल्या दिवशी, सीएसआयआर-नीरीचे प्रधान तांत्रिक अधिकारी डॉ. सी. पद्माकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रारंभिक औपचारिकता आणि सुरक्षा प्रोटोकॉल पूर्ण करण्यात आले. दर ९५ सेकंदाला ५०० लिटरपेक्षा जास्त पाणी काढले जात आहे, जे दर्शवते की विहीर स्वच्छ करणे ही एक वेळखाऊ प्रक्रिया असेल. मनोरंजक गोष्ट म्हणजे, सुमारे एक मीटर पाणी काढल्यानंतर, विहीर रात्रीतून आपोआप १२ इंचांनी रिचार्ज होते, जे प्राचीन विहीर अजूनही सक्रिय आहे आणि पाणी पुरवठ्यात योगदान देऊ शकते याचे एक मजबूत संकेत आहे.

"स्वयंचलित रिचार्जवरून असे दिसून येते की विहीर जिवंत आहे आणि ती पाण्याचा शाश्वत स्त्रोत बनू शकते, ज्यामुळे परिसरातील पाण्याचे संकट कमी होईल," असे डॉ. डबली म्हणाले. रेल्वे वर्क्स विभाग व डॉ. डबली ही या विहीर स्वच्छता मोहिमेवर बारकाईने लक्ष ठेवत आहे.